साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १९.११.२०२६ | अंक नं. १९३ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

स्व. अजित पवार अपघातातील विमान कंपनीचा मालक देश सोडून पळून जाण्याची शक्यता : आ. रोहित पवार

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकातून संविधानाची मोडतोड होणार असेल तर विरोध कायम

नगर – माझे काका दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी अद्यापही तपास यंत्रणेने गुन्हा दाखल केलेला नाही. दादांच्या अपघातासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दोषी धरलेले नाही पण ते या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने नेण्याच्या सूचना संबंधीत यंत्रणांना का देत नाहीत. या अपघातातील व्हीएसआर व्हेंचर्स विमान कंपनीचा मालक व्ही. के. सिंह याला वाचवण्याचा प्रयत्न का होत आहे. त्याची दोन मुले पाच विमाने घेऊन परदेशात पळाली आहेत. व्ही. के. सिंहही परदेशात पळून जाण्याची शक्यता आहे, असा आरोप करत आमदार रोहित पवार यांनी मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) विधेयकातून संविधानाची मोडतोड होणार असेल तर आमचा विरोध कायम असेल अशी भूमिका नगरमध्ये पत्रकारांशी बोलताना मांडली. आ. पवार हे १९ नोव्हेंबर रोजी कर्जत-जामखेड मतदारसंघातील विविध प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी विविध विषयावर संवाद साधला. आपले काका अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबतच्या तपासात दिरंगाई होत असून यातील दोषींना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी दोन दिवसांपूर्वी केला होता. याचा पुर्नउच्चार करताना त्यांनी या प्रकरणात मी मुख्यमंत्र्यांना दोषी धरलेले नाही पण ते संबंधीत यंत्रणांना योग्य तपास करण्यास का सांगत नाही याला माझा आक्षेप असल्याचे सांगितले.

बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो भाजपाने फडायला लावला : मी अजितदादा यांच्या अपघात प्रकरणातील चौकशीला दिरंगाई होत असलेल्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. हा मुद्दा भाजपाला अडचणीत आणणारा असल्यामुळे त्यांनी सोनिया गांधी यांच्या पुस्तकाचा मुद्दा पुढे आणत शिवसेनेच्या शिंदे गटाला बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडायला लावून याविषयावरचे लक्ष विचलीत करण्याचा प्रयत्न केला आहे, असा आरोप आ.रोहित पवार यांनी यावेळी केला. दादांच्या अपघाताच्या चौकशीला विलंब होत असल्याबाबत मी गृहमंत्री अमित शहा व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना पत्र पाठविणार असल्याचे ते म्हणाले.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण काहींना नको : राज्यात सध्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण होणार असल्याच्या चर्चा घडत असताना रोहित पवार यांनी अशी शक्यता फेटाळून लावली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊ नयेत याला काही लोकांचा विरोध असून ते असे होऊ देणार नाहीत असे ते म्हणाले. मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) विधेयकाबाबत इंडीया आघाडातील मोठे पक्ष कोणती भूमिका मांडत आहे हे समजून घेतले पाहिजे. याबाबत काही मतभेद असू शकतात पण या आडून संविधानाला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न असेल तर तो कदापीही सहन केला जाणार नाही, असा इशारा पवार यांनी दिला.

राज्याच्या प्रश्नावर लढतोय तर यांच्या पोटात का दुखते : रोहित पवार आपल्या कर्जत-जामखेड मतदारसंघात कमी व राज्यात जास्त फिरतात असा आरोप विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केला होता. याकडे पवार यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, राज्याचे प्रश्न मांडताना त्यातून मतदारसंघाचे प्रश्नही सुटत असतात. कर्जमाफी, कांदा, एमपीएससी हे प्रश्न मतदारसंघाशी निगडीत नाहीत का असा सवाल करत रोहित पवार म्हणाले मी राज्याच्या प्रश्नावर लढतोय तर यांच्या पोटात का दुखते. महाविकास आघाडीच्या काळात जामखेड शहरासाठी १३८ कोटींची पाणीयोजना मंजूर केली होती. स्वतः अजितदादांनी ही योजना दिली होती पण राजकीय आकसातून राम शिंदे हे काम पूर्ण होऊ देत नाही. सभापती पदाचा वापर ते जनतेच्या हितासाठी नव्हे तर स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

दुष्काळप्रश्नावर व्यापक आंदोलन छेडणार : सध्या कर्जत-जामखेडसह संपूर्ण राज्यात दुष्काळाची परिस्थिती भयावह असताना सरकारला याचे गांभीर्य नाही. मतदारसंघातील विविध विकासकामांची राजकीय द्वेषातून अडवणूक केली जाते. याबाबत लवकरच मतदारसंघात व्यापक आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही रोहित पवार यांनी दिला. राज्य शासनाने दिवाळीत शेतकऱ्यांना पाच हजार रूपये देण्याची घोषणा केली. परंतु ६० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यातच हे पैसे जमा झाले आहेत. ४० टक्के शेतकरी या लाभापासून वंचित आहे. यावरही या आंदोलनात आवाज उठविला जाईल, असे पवार यांनी सांगितले. (छायाचित्रे पान २ वर)

जणु अवघा निसर्गच आपल्या हाती
साईबन
गोड गोड हुरडा गरम गरम वनभोजनासह सहकुटुंब
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये
निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
हुरडा पार्टी
बोटींग/पपेट शो/अंतराळ सफर/ बर्ड पार्क/ बर्मा ब्रिज/अॅक्वेरियम नक्षत्र उदयान/ बिन बादल बरसात/ हवामें उडते जाओ /बटरफ्लाय गार्डन
Offroading Services
हया प्रमाणे २५ पेक्षाही अधिक मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर साईबन कृषी पर्यटन केंद्र
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

मोलकरणीने केली घरात 'हातसफाई'

दागिने, रोकड, मोबाईलसह हजारोंचा ऐवज लंपास

नगर – घरकामासाठी ठेवलेल्या मोलकरणीनेच घराची सफाई करता करता मौल्यवान ऐवजाची 'हातसफाई' केल्याची घटना आनंदधाम समोर असलेल्या अर्चना अपार्टमेंटमध्ये उघडकीस आली आहे. या मोलकरणीने ७४ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.

याबाबत लता रतनलाल बोरा (वय ७८ वर्षे, रा. फ्लॅट नंबर २, अर्चना अपार्टमेंट, आनंदधाम समोर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी अंजली (पूर्ण नाव व पत्ता माहीती नाही, रा. सारसनगर, अहिल्यानगर) या आरोपी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १०.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी यांच्या घरी ही चोरीची घटना घडली. आरोपी महिला फिर्यादी यांच्या घरी घरकामास असताना तिने फिर्यादी यांची नजर चुकवली. बेडरूमच्या कपाटाच्या कप्प्यातील सुमारे २७ ग्रॅम वजनाचे सोन्याच्या धातूचा बेल्ट असलेले मनगटी घड्याळ, ज्याची किंमत ६५ हजार रुपये आहे, ते चोरून नेले.

तसेच कपाटातील ४ हजार ५०० रुपये रोख रक्कम, याशिवाय बेडवर ठेवलेला ५ हजार रुपये किमतीचा नोकिया कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल फोनही चोरून नेला. असा एकूण ७४ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज आरोपी महिलेने लंपास केला आहे. घरकामाला असलेल्या आरोपी महिलेकडे फिर्यादी यांनी वारंवार चोरी केलेल्या ऐवजाची मागणी केली होती. मात्र, आरोपी महिलेने चोरी केलेला ऐवज परत न दिल्याने फिर्यादी यांनी अखेर १८ नोव्हेंबर रोजी रात्री कोतवाली पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली.

याप्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल स्वाती तोरडमल करत आहेत.

सुवर्णमय
वाटचाल प्रगतीची...
विश्वसनीय बँकींग सेवा सुविधांची...
सुवर्ण 50 महोत्सव
सभासद-खातेदार आणि ग्राहकांना भरभरुन लाभांश व भेट देणाऱ्या अ.नगर मर्चन्टस् बँकेच्या सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाचे हार्दिक अभिनंदन !
सभासदांना रु. ५१००/- भेट पावती देण्यासाठी होणाऱ्या कार्यक्रमास आमच्याही शुभकामना !

पेब इंडियन हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन
आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे
Diwali Special
• चंदेरी आणि पटोरा साडी • बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स • पॅच वर्क • पश्चिम बंगाल साडी • लखनवी चिकन • कोटा सिल्क • काश्मीर सूट आणि पश्मिना शाल • जयपूर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी • मल्टी कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ९९.०० ते रा. ७०.०० पर्यंत
पार्किंग व एन्ट्री फ्री
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

आम्हाला त्वरित पाहिजे आहेत
AI VIDEO EDITOR
आमच्या मराठी फिल्म प्रोजेक्टसाठी AI एडिटिंगची संपूर्ण माहिती असलेला हुशार आणि क्रिएटिव्ह मुलगा किंवा मुलगी त्वरित पाहिजे.
कामाचे स्वरूप :
- AI च्या माध्यमातून व्हिडिओ एडिटिंग करणे.
- प्रत्येक सीनला योग्य Background Music लावणे.
- कॉमेडी, सस्पेन्स आणि लव्ह सीनचे एडिटिंग करणे.
- सिनेमॅटिक इफेक्टस् आणि ट्रान्झिशन्स देणे.
- AI Voice, Sound Effects आणि कलर ग्रेडिंग करणे.

आवश्यक पात्रता :
- AI Video Editing चे संपूर्ण ज्ञान असावे आणि chatgpt चे पण संपूर्ण ज्ञान असावे.
- नवीन AI टूल्स वापरण्याचा अनुभव असावा.
- मेहनती, प्रामाणिक आणि क्रिएटिव्ह असावे.

संपर्क क्रमांक : 8080461110
कॉल करण्याची वेळ
सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.

थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्वग व
अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

बायड परिवार
सर्व नामांकित कंपन्यांच्या ब्रॅण्डेड सौंदर्य प्रसाधनासाठी महिला वर्गाचे एकमेव - आवडते दालन...
महावीर कॉस्मेटिक्स
मोची गल्ली व सारडा लेन, अहिल्यानगर.

जयकुमार मुनोत व परिवार
मायक्रोटेक इंडस्ट्रीज
Highly Precise Machine Components & Elec. Components Manufacturing & Assessably
सी २०/३/६, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त सर्व सुविधापूर्ण आरोग्यमंदिर..
नोबल परिवार
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा.लि.
प्रेमदान चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर.

Dishan

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन – २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९xxxxxx
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

बाजारपेठांमधील 'अतिक्रमणे' बाबत विधीमंडळ समितीकडे याचिका सादर

गंज बाजार, सराफ बाजार, टिन गल्ली, जुना कापड बाजार भागाचा गुदमरलेला श्वास मोकळा व्हावा

नगर– अहिल्यानगर शहरातील गंज बाजार, सराफ बाजार, टिन गल्ली, जुना कापड बाजार व लगतच्या व्यापारी क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, पदपथ, बाजारपेठेचे प्रवेशमार्ग आणि वाहतुकीच्या जागांवरील अनधिकृत अतिक्रमणे, गंज बाजार मुख्य प्रवेशमार्गावर दुचाकी वाहनांचे अनधिकृत पार्किंग, बाजारपेठेच्या प्रवेश व निर्गमन व्यवस्थेस निर्माण होणारा अडथळा, महानगरपालिका प्रशासनाची निष्क्रियता, वैधानिक कर्तव्यपालनातील कसूर आणि सार्वजनिक हिताच्या संरक्षणासाठी नो–पार्किंग झोन घोषित करून अतिक्रमणमुक्त बाजारपेठ निर्माण करण्याबाबत गोल्ड ज्वेलर्स कौन्सिलचे चेअरमन प्रकाश लोळगे यांनी विधिमंडळ याचिका समितीमार्फत सखोल चौकशी व कालबद्ध कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

या याचिकेत म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरातील गंज बाजार, सराफ बाजार, टिन गल्ली, जुना कापड बाजार आणि लगतच्या व्यापारी परिसरामध्ये अनेक वर्षांपासून सातत्याने निर्माण होत असलेल्या अनधिकृत अतिक्रमणांच्या गंभीर प्रश्नाकडे महाराष्ट्र विधानमंडळाचे लक्ष वेधण्यासाठी ही सविस्तर जनहित याचिका सादर करीत आहे. प्रस्तुत याचिका कोणत्याही विशिष्ट व्यक्ती, समाजघटक अथवा व्यवसायवर्गाच्या विरोधात नसून सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, कायद्याचे राज्य, नागरिकांचे नागरी हक्क, व्यापारी क्षेत्राचे सुव्यवस्थित व्यवस्थापन, वाहतूक सुरक्षितता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वैधानिक जबाबदाऱ्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या व्यापक सार्वजनिक हिताच्या उद्देशाने सादर करण्यात येत आहे.

नागरिकांना सुरक्षितपणे ये–जा करण्यास अडथळे

अहिल्यानगर शहरातील गंज बाजार, सराफ बाजार, टिन गल्ली, जुना कापड बाजार व लगतचा व्यापारी परिसर हा शहराच्या आर्थिक, व्यापारी व सामाजिक व्यवहारांचा अत्यंत महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. या परिसरामध्ये अनेक वर्षांपासून सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक, पादचारी मार्ग आणि वाहतुकीसाठी उपलब्ध असलेल्या जागांवर अनधिकृत हातगाड्या, तात्पुरती दुकाने, फेरीवाले, विक्री स्टॉल, वस्तूंची मांडणी तसेच इतर व्यावसायिक अडथळ्यांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे सार्वजनिक रस्त्यांची प्रत्यक्ष वापरयोग्य रुंदी कमी होत असून नागरिकांना सुरक्षितपणे ये–जा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

आपत्कालीन सेवांच्या वाहनांच्या मार्गात व्यत्यय

अधिकृत व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये येणाऱ्या ग्राहकांना वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि लहान मुलांना बाजारपेठेतून सुरक्षितपणे मार्गक्रमण करणे कठीण होत आहे. रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने आणि इतर आपत्कालीन सेवांच्या वाहनांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होण्याची गंभीर शक्यता आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ व्यापारी वर्गाच्या व्यावसायिक सोयीचा नसून संपूर्ण शहराच्या सार्वजनिक सुरक्षिततेचा, वाहतूक व्यवस्थेचा आणि नागरी प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा विषय बनलेला आहे.

दुचाकी वाहनांच्या अनधिकृत पार्किंगबाबत विशेष तक्रार

गंज बाजार व सराफ बाजार या व्यापारी क्षेत्राच्या प्रवेशद्वाराजवळील रस्त्यावर दुचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर अनियंत्रित व अनधिकृत पार्किंग करण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येत आहे. विशेषतः गंज बाजारपेठेच्या मुख्य प्रवेशद्वारावरील रस्त्याच्या परिसरात अनेक दुचाकी वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अथवा प्रवेशमार्गाच्या वापरयोग्य जागेत उभी केलेली आढळून येतात. परिणामी बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या व बाजारपेठेतून बाहेर पडणाऱ्या नागरिकांच्या वाहनांना पुरेशी जागा उपलब्ध होत नाही. ग्राहक, व्यापारी, मालवाहतूक करणारी वाहने आणि पादचारी यांना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अडथळ्यांचा सामना करावा लागतो. काही वेळा प्रवेशमार्ग अरुंद होऊन वाहतूक कोंडी निर्माण होते. बाजारपेठेच्या मुख्य प्रवेशद्वारावरच अशा प्रकारे वाहनांचे पार्किंग होत असल्याने संपूर्ण बाजारपेठेच्या वाहतूक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे.

सामान्य वाहनतळ म्हणून वापरण्यास अयोग्य

सदर ठिकाण हे सामान्य वाहनतळ म्हणून वापरण्यासाठी योग्य नसून बाजारपेठेत प्रवेश व निर्गमन करणाऱ्या नागरिकांसाठी मोकळे ठेवणे आवश्यक असलेले महत्त्वाचे वाहतूक क्षेत्र आहे. बाजारपेठेच्या प्रवेशद्वारावरच दुचाकी वाहनांची अनधिकृत गर्दी निर्माण होणे म्हणजे सार्वजनिक वाहतुकीच्या मुक्त प्रवाहास अडथळा निर्माण होणे होय. या परिस्थितीमुळे ग्राहकांची बाजारपेठेत येण्याची गैरसोय होत असून अधिकृत व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या व्यावसायिक व्यवहारांवरही विपरीत परिणाम होत आहे. बाजारपेठेच्या प्रवेशद्वारावर होणारे असे अनियंत्रित पार्किंग भविष्यात गंभीर अपघात अथवा आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्यात अडथळा निर्माण करू शकते.

कायमस्वरूपी नो पार्किंग झोन घोषित करावा

त्यामुळे गंज बाजारपेठेच्या प्रवेशमार्गाची महानगरपालिका व वाहतूक पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाद्वारे तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून अधिकृत रस्त्याची रुंदी, प्रवेश व निर्गमनाची आवश्यकता आणि वाहतुकीची वस्तुस्थिती निश्चित करण्यात यावी. सदर रस्त्याचा आवश्यक भाग दुचाकी व इतर वाहनांच्या पार्किंगसाठी प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ११७ अन्वये सक्षम प्राधिकरणाने स्थानिक प्राधिकरणाशी सल्लामसलत करून आवश्यक निर्णय घ्यावा. त्यानुसार संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून अधिकृत अधिसूचना किंवा आदेश निर्गमित करून त्या ठिकाणी कायमस्वरूपी नो पार्किंग झोन घोषित करण्यात यावा.

दिशादर्शक चिन्हे बसविण्यात यावीत

कलम ११६ नुसार आवश्यक अधिकृत वाहतूक चिन्हे, नो–पार्किंग फलक, रस्त्यावरील पट्टे व दिशादर्शक चिन्हे बसविण्यात यावीत. सदर प्रतिबंधित क्षेत्रामध्ये दुचाकी अथवा अन्य वाहनांचे पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर लागू मोटार वाहन कायदे व नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी. आवश्यकतेनुसार अधिकृत टोइंग व्यवस्था व वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची नियमित नियुक्ती करून प्रवेशमार्ग कायमस्वरूपी मोकळा ठेवण्यात यावा. बाजारपेठेच्या प्रवेशद्वाराला वाहनतळाचे स्वरूप प्राप्त होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी..

कायदेशीर वाहनतळ उपलब्ध करणे आवश्यक

सदर ठिकाणी नो–पार्किंग झोन घोषित करण्याची मागणी ही कोणत्याही वाहनधारकाच्या वैयक्तिक सोयीच्या विरोधात नसून सार्वजनिक वाहतुकीचा मुक्त प्रवाह, बाजारपेठेची प्रवेशयोग्यता, नागरिकांची सुरक्षितता आणि व्यापारी क्षेत्राचे नियोजनबद्ध व्यवस्थापन या आवश्यक सार्वजनिक हिताच्या बाबींवर आधारित आहे. कायदेशीर वाहनतळ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्यास बाजारपेठेच्या प्रवेशमार्गापासून योग्य अंतरावर पर्यायी पार्किंगची जागा निश्चित करण्याचाही विचार करण्यात यावा. मात्र, बाजारपेठेचा मुख्य प्रवेशमार्ग कोणत्याही परिस्थितीत वाहनांच्या अनधिकृत पार्किंगमुळे बाधित होणार नाही, याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी.

अतिक्रमणधारकांवरील कायदेशीर कार्यवाही व सार्वजनिक रस्त्यांचे संरक्षण

सदर परिसरातील सार्वजनिक रस्ते व पदपथांवर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्या अथवा सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या सर्व संबंधित व्यक्ती, व्यावसायिक घटक, हातगाडीधारक, अनधिकृत स्टॉलधारक आणि इतर अतिक्रमणधारकांची कायदेशीर स्थिती तपासण्यात यावी. संबंधित व्यक्तींकडे महानगरपालिकेची वैध परवानगी, पथविक्रेता प्रमाणपत्र अथवा अन्य सक्षम प्राधिकरणाची मान्यता आहे किंवा नाही, याची अधिकृत पडताळणी करण्यात यावी. परवानगी नसताना सार्वजनिक जागा व्यापणे, वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, पदपथांवर अनधिकृत व्यवसाय करणे अथवा कायदेशीर आदेशानंतरही अतिक्रमण कायम ठेवणे अशा बाबी निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार नोटीस, जप्ती, निष्कासन, दंडात्मक कारवाई आणि आवश्यकतेनुसार अन्य वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

पुन्हा अतिक्रमण केल्यास त्याची स्वतंत्र चौकशी करावी

यापूर्वी प्रशासनाकडून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही झाल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण निर्माण होत असल्यास त्याची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी. वारंवार नियमभंग करणाऱ्या व्यक्तींना कायदेशीर नोटीस देऊनही अतिक्रमण कायम ठेवले जात असल्यास त्यांच्याविरुद्ध लागू कायद्यांनुसार पुनरावृत्तीच्या स्वरूपातील उल्लंघनाची नोंद घेऊन पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. सार्वजनिक रस्ते आणि पदपथ हे कोणत्याही व्यक्तीच्या खासगी वापरासाठी उपलब्ध नसून संपूर्ण नागरिकांच्या सामूहिक वापरासाठी आहेत, याची स्पष्ट जाणीव संबंधित अतिक्रमणधारकांना करून देण्यात यावी. अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही ही केवळ तात्पुरती मोहीम न राहता सार्वजनिक जागांचे कायमस्वरूपी संरक्षण करणारी नियमित प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

पूर्वीच्या तक्रारी व प्रशासकीय निष्क्रियतेची चौकशी

सदर प्रश्नाबाबत यापूर्वी महानगरपालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि संबंधित शासकीय विभागांकडे वेळोवेळी तक्रारी व निवेदने सादर करण्यात आलेली आहेत. मात्र, आजपर्यंत या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना झालेली दिसून येत नाही. त्यामुळे मागील काही वर्षांत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारी, त्यांची आवक नोंद, संबंधित अधिकाऱ्यांकडे केलेले प्रेषण, प्रत्यक्ष स्थळपाहणीचे अहवाल, निर्गमित आदेश, अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमांची नोंद, पार्किंग नियंत्रणासंबंधीचे आदेश आणि त्यावरील अंमलबजावणीचे अभिलेख मागविण्यात यावेत. विशेषतः गंज बाजार रस्त्यावर दुचाकी वाहनांचे पार्किंग सातत्याने होत असताना संबंधित वाहतूक नियंत्रण यंत्रणेने आजपर्यंत कोणती कार्यवाही केली आहे, नो–पार्किंगबाबत कोणते आदेश किंवा प्रस्ताव आहेत अथवा नाहीत आणि सदर प्रवेशमार्ग मोकळा ठेवण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात आलेली आहे, याचा लेखी खुलासा मागविण्यात यावा.

संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही परीक्षण व्हावे

अतिक्रमणधारकांकडून अथवा वाहनचालकांकडून वारंवार नियमभंग होत असल्यास त्यांना कायदेशीर नोटीस, दंडात्मक कार्यवाही आणि आवश्यकतेनुसार निष्कासनाची प्रक्रिया लागू करण्यात यावी. त्याचप्रमाणे अतिक्रमण नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचेही अभिलेखाधारित परीक्षण करण्यात यावे. चौकशीमध्ये प्रशासकीय निष्क्रियता, कर्तव्यच्युती, अनधिकृत परवानगी किंवा नियमबाह्य सहकार्य आढळल्यास संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत नियमानुसार जबाबदारी निश्चित करून योग्य कार्यवाही करण्यात यावी.

विधिमंडळ याचिका समितीसमोरील विनंती व अपेक्षित कार्यवाही

महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २६६ ते २७२ मधील तरतुदींच्या अधीन राहून प्रस्तुत याचिकेचा स्वीकार करण्याची विनंती आहे. नियम २६७ नुसार याचिकेचे निर्धारित स्वरूप, सभ्य व संयत भाषा आणि याचिकाकर्त्याची स्वाक्षरी यांचे पालन करण्यात येत आहे. नियम २६८ व २६९ नुसार संबंधित विधानसभा सदस्यामार्फत आणि अध्यक्षांची अनुमती प्राप्त करून याचिका सभागृहात सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. नियम २७२ नुसार नियमानुसार विधिमंडळ याचिका समितीकडे संदर्भित झाल्यानंतर समितीने सदर प्रकरणातील सार्वजनिक हिताचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व नगरविकास विभागाकडून सविस्तर अहवाल मागवावा. गंज बाजार, सराफ बाजार व संबंधित व्यापारी परिसरातील सर्व सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि प्रवेशमार्गांची संयुक्त स्थळपाहणी करून अधिकृत मोजमाप व अतिक्रमणांची व्याप्ती निश्चित करण्यात यावी.

यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारींचा तपशील

प्रस्तुत याचिकेचा विषय हा अचानक निर्माण झालेला नसून अनेक वर्षांपासून स्थानिक व्यापारी व नागरिकांना भेडसावत असलेल्या समस्येचा परिणाम आहे. या प्रश्नाबाबत यापूर्वी विविध प्रशासकीय प्राधिकरणांकडे लेखी निवेदने, तक्रारी आणि कायदेशीर स्वरूपाचे मसुदे तयार करण्यात आलेले आहेत. २९ जुलै २०२५ रोजी सराफ बाजार व संबंधित व्यापारी परिसरातील अतिक्रमणांच्या प्रश्नासंदर्भात महानगरपालिका प्रशासनाकडे निवेदन सादर. ४ ऑगस्ट २०२५ रोजी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यांना अतिक्रमणाच्या प्रश्नावर पूर्वी तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याबाबत सविस्तर व सुधारित पत्राचा मसुदा तयार करण्यात आला. सन २०२६ मध्ये गंज बाजार व सराफ बाजारातील अतिक्रमणांचा प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक प्रशासनापासून राज्य शासनाच्या स्तरापर्यंत विषय मांडण्याची कार्यवाही पुढे नेण्यात आली. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, महानगरपालिका प्रशासन, मुख्यमंत्री कार्यालय, राज्यपाल कार्यालय आणि संबंधित विभागांकडे सादर करण्यासाठी विविध निवेदने व पत्रांचे मसुदे तयार करण्याबाबत काम करण्यात आले. व्यापारी वर्गाचे संघटन व नागरिकांच्या समस्यांबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी प्रसिद्धीपत्रक व निवेदन तयार करण्याचेही नियोजन करण्यात आले.

बंद घर चोरट्यांनी केले लक्ष्य, सव्वा लाखांची रोकड लंपास

केडगाव उपनगरातील मराठानगर परिसरातील घटना, गुन्हा दखल

नगर – शहर व उपनगरात सध्या चोऱ्या, घरफोड्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. विशेषतः चोरट्यांकडून बंद असलेली घरे लक्ष्य केली जात आहेत. अशीच एक घटना केडगाव उपनगरातील मराठानगर येथे घडली आहे. या भागातील तानाजी मालुसरे अपार्टमेंटमधील एका फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने तब्बल १ लाख २५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

याबाबत आदर्श ज्ञानदेव तनपुरे (वय २५ वर्षे, रा. तानाजी मालुसरे अपार्टमेंट, मराठानगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांचे वडील ज्ञानदेव लक्ष्मण तनपुरे, आई सविता आणि भाऊ प्रशांत यांच्यासह एकत्र राहतात. फिर्यादी व त्यांचा भाऊ प्रशांत हे दोघेही पुण्यातील एका कंपनीत इंजिनिअर म्हणून काम करतात व तेथेच राहतात, तर वडील ज्ञानदेव हे ठाणे येथे नोकरी करतात. आई सविता या केडगाव येथील राहत्या घरी एकट्याच राहत होत्या. १३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२वाजण्याच्या सुमारास भाऊ प्रशांत याने आई सविता यांना दिवाळी सणानिमित्त माहेरी जायचे असल्याने तारकपूर बस स्टँड येथे सोडले होते, तर भाऊ व वडीलही दिवाळी संपल्यानंतर कामावर परतले होते. त्यानंतर १७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी आदर्श तनपुरे हे घराच्या मुख्य दरवाजाला कुलूप लावून आपल्या मोटारसायकलवरून पुण्याला कामावर गेले.

दरम्यान, १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास आई सविता यांनी फोन करून घरी चोरी झाल्याची माहिती दिली. हा निरोप मिळताच आदर्श व त्यांचा भाऊ प्रशांत केडगाव येथील घरी तातडीने पोहोचले. त्यावेळी आई सविता आणि मामा संदीप नानासाहेब निर्मळ हे देखील तेथे उपस्थित होते. घराची पाहणी केली असता मुख्य दरवाजाला लावलेले कुलूप गायब होते आणि दरवाजा अर्धवट उघडा दिसून आला. आत जाऊन पाहणी केली असता घरातील साहित्याची व बेडरूममधील कपाटाची उचकापाच झालेली होती. कपाटात घरखर्चासाठी ठेवलेली आणि अपार्टमेंटच्या मेंटेनन्ससाठी पत्र्याच्या डब्यात ठेवलेली अशी एकूण १ लाख २५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले.

१७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.१५ वाजेपासून ते १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि ही रक्कम लंपास केली. या प्रकरणी आदर्श तनपुरे यांच्या कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०५(अ), ३३१(३) आणि ३३१(४) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास स.पो.नि.कुणाल सपकाळे करत आहेत.

एकविरा चौक परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील एकविरा चौक परिसरातून एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अपहृत मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. फिर्यादी या धुणेभांड्याचे काम करतात, तर त्यांचे पती हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. त्यांना १ मुलगा आणि १४ वर्षांची १ मुलगी आहे. ती आईसोबत सावेडी भागात धुणेभांड्याचे काम करत होती. १२ नोव्हेंबर सकाळी ११ ते दुपारी २ या कालावधीत ती घरातून गायब झाली. तिच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तिचा फोन बंद असल्याचे आढळून आले.

कुटुंबीयांनी आजूबाजूच्या परिसरात तसेच संपूर्ण अहिल्यानगर शहरात तिचा कसून शोध घेतला, मात्र ती कोठेही मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी आपल्या मुलीला कायदेशीर रखवालीतून फूस लावून पळवून नेल्याची खात्री झाल्यानंतर फिर्यादीने तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध बीएनएस कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

जावयाच्या नावाने लोन मंजूर झाल्याचे खोटे सांगून महिलेची फसवणूक; सोन्याच्या बांगड्या घेऊन पसार

नगर – जावयाचे २ लाख १५ हजार रुपयांचे लोन मंजूर झाल्याचे खोटे सांगून विश्वास संपादन करत एका अनोळखी भामट्याने ७६ वर्षीय वृद्धेच्या हातातील १ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या चार सोन्याच्या बांगड्या लंपास करत त्यांची फसवणूक केल्याची घटना शहरातील चाणक्य चौकात १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत सौ. विमला अशोकलाल भंडारी (वय ७६, रा. परदेशी गल्ली, जैन मंदिराच्या पाठीमागे, अहिल्यानगर; मूळ रा. बाणेर, पुणे) यांनी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे १७ नोव्हेंबर रोजी आनंदऋषी हॉस्पीटल, नेत्रालय येथे डोळ्याचे ऑपरेशन झाले होते. दुसऱ्या दिवशी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास त्या पती अशोकलाल मोहनलाल भंडारी यांच्यासह डोळे तपासणीसाठी हॉस्पीटलमध्ये गेल्या होत्या.

तपासणीनंतर भाची वैशाली चेगेंडिया हिने त्यांना घरी जाण्यासाठी रिक्षा ठरवून दिली आणि ती निघून गेली.सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पती–पत्नी चाणक्य चौकातून रिक्षाने घरी जात असताना लाल रंगाच्या मोटारसायकलवरून एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ आला. त्याने पती अशोकलाल भंडारी यांना जावई महेश सचदेव कसा आहे, अशी विचारणा केली. अनोळखी इसम जावयाला ओळखत असावा या समजुतीने पतीने महेश मस्त असल्याचे सांगितले. त्यावर भामट्याने जावई महेशचे २ लाख १५ हजार रुपयांचे लोन मंजूर झाले असून त्याचे पैसे तुमच्याजवळ देतो, असे सांगितले. हा प्रकार ऐकून पती अशोकलाल भंडारी हे जावई महेश याला फोन करण्यासाठी बाजूला गेले.

त्याच संधीचा फायदा घेत अनोळखी इसम फिर्यादीजवळ महिलेजवळ आला आणि आईसारखे संबोधत रिक्षातून खाली उतरवून सोन्याच्या बांगड्यांचे वजन करून देतो, असे म्हणाला. सुरुवातीला दोन बांगड्या घेतल्यानंतर त्याने पतीकडे दहा रुपये टोकन मागितले, मात्र सुट्टे पैसे नसल्याचे समजताच उर्वरित दोन बांगड्याही काढून घेतल्या. त्यानंतर भामटा समोरच्या दातांच्या हॉस्पीटलमध्ये गेला परंतु तो बराच वेळ झाला तरी परत न आल्याने पती–पत्नीने हॉस्पीटलमध्ये आत जाऊन चौकशी केली असता तो तिथे आढळून आला नाही. त्या अनोळखी भामट्याने आपली फसवणूक केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या घटनेत अंदाजे साडेचार तोळे वजनाच्या १ लाख ४५ हजार रुपये किमतीच्या चार सोन्याच्या बांगड्यांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अनोळखी आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

रिअल इस्टेट व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला

जुन्या वादातून बेसबॉलच्या दांडक्याने व लोखंडी रॉडने केली मारहाण

नगर – नगर शहरात जुन्या वादातून दोघांनी रिअल इस्टेट व्यावसायिकावर बेसबॉलच्या दांडक्याने व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची घटना कायनेटीक चौक परिसरातील रवीश कॉलणीत १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० ते ६.४५ वाजण्याच्या दरम्यान घडली. या मारहाणीत अभिजित दशरथ धुमाळ (वय ४२, रा. भवानीनगर, मार्केट यार्ड मागे, अहिल्यानगर) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांनी दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलिसांनी आरोपी सतिष अशोक सायंबर आणि कैलास अशोक सायंबर (रा.अहिल्यानगर) यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ११८ (१), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या वादातून मारहाण; बेसबॉल दांड्या व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला, दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी धुमाळ हे १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी कायनेटीक चौक परिसरातील रवीश कॉलणीत गेले होते. त्यावेळी त्यांना आरोपी सतिष सायंबर आणि कैलास सायंबर यांनी अडविले. तुम्ही आमच्या वडिलांसोबत भांडण का करता, असे म्हणत आरोपींनी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ केली. त्यामुळे त्यांच्यात वाद सुरु झाला वादाच्या वेळी आरोपी सतिष सायंबर याने हातातील बेसबॉलच्या दांड्याने फिर्यादीच्या डोक्यात, हाता–पायावर आणि बरगडीवर जोरदार मारहाण केली. दुसरा आरोपी कैलास सायंबर याने हातातील लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

या हिंसक झटापटीदरम्यान फिर्यादीच्या हातातील दोन सोन्याच्या अंगठ्या गहाळ झाल्या आहेत. मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या फिर्यादीला उपचारासाठी अहिल्यानगरच्या शासकीय सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.रुग्णालयात उपचार सुरू असताना सिव्हिल हॉस्पिटलच्या वैद्यकीय अहवाल व जबाबावरून पोलिसांनी तातडीने दखल घेतली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून गुन्ह्यात वापरलेला बेसबॉल दांडा व लोखंडी रॉड जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस स्टेशनचे पो.हे.कॉ. सुर्यकांत डाके हे करत आहेत.

ॲड. सुजीत वहाडणे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बार कौन्सिलचे सदस्य ॲड. सुजीत वहाडणे (वय ४८) यांचे १९ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, २ मुली, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. डॉ. सचिन वहाडणे यांचे ते लहान बंधू तर सेंट्रल बँकेचे निवृत्त शाखाधिकारी रामचंद्र वहाडणे यांचे ते चिरंजीव होत.







आमदार रोहित पवार हे जिल्हाधिकारी कार्यालयात आले असता नागरिकांनी त्यांची भेट घेऊन विविध प्रश्न मांडले. (छायाचित्र : लहू दळवी)

बोल्हेगाव येथून मोटरसायकलची चोरी

नगर – बोल्हेगाव येथील महालक्ष्मी पार्क, आंबेडकर चौक परिसरातून ७० हजार रुपये किमतीची टीव्हीएस कंपनीची रोनिन मोटरसायकल (क्र. एमएच १७ डीआर ०६४७) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १६ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत निखील बाबासाहेब सोनवणे (वय २७ वर्षे, रा. महालक्ष्मी पार्क, आंबेडकर चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गृहिणी

आरोग्य

मुले व भ्रमणध्वनीचे व्यसन...

लहान मुलांमध्ये भ्रमणध्वनीचे व्यसन ही आजच्या काळातील एक गंभीर समस्या बनत चालली आहे. लहान वयातच मुलांच्या हातात भ्रमणध्वनी दिला जातो आणि हळूहळू त्यांना त्याची सवय लागते. सुरुवातीला मुलांना गाणी दाखवण्यासाठी किंवा जेवण भरवण्यासाठी भ्रमणध्वनी दिला जातो पण पुढे तीच सवय त्यांच्या आयुष्याचा भाग बनते. सतत भ्रमणध्वनी पाहिल्यामुळे मुलांच्या डोळ्यांवर ताण येतो, डोके दुखते, झोप कमी होते आणि अभ्यासात लक्ष लागत नाही. मुलांची चिडचिड वाढते, ते एकटे राहू लागतात. भ्रमणध्वनीतील हलणारी चित्रे आणि आवाज यामुळे मुलांचे मन सतत त्याकडेच ओढले जाते आणि त्यांना इतर कोणत्याच गोष्टीत आनंद वाटेनासा होतो. यावर उपाय म्हणून सर्वात आधी घरातील मोठ्या माणसांनी स्वतः भ्रमणध्वनीचा वापर कमी केला पाहिजे कारण मुले मोठ्यांचे अनुकरण करतात. मुलांना लहानपणापासूनच पुस्तके वाचण्याची, चित्रे काढण्याची, गाणी म्हणण्याची, गोष्टी ऐकण्याची आणि मैदानी खेळ खेळण्याची आवड लावावी. त्यांना मित्रांबरोबर खेळू द्यावे आणि घरातील छोटी छोटी कामे करायला सांगावीत म्हणजे त्यांचे मन इतर कामात गुंतेल. मुलांसाठी ठराविक वेळ ठरवून द्यावा आणि त्या वेळेपेक्षा जास्त वेळ भ्रमणध्वनी देऊ नये. त्यांच्याशी जास्त वेळ बोलावे आणि त्यांच्या मनातील भावना समजून घ्याव्यात. घरात सर्वांनी एकत्र बसून जेवणे, एकत्र गप्पा मारणे, एकत्र फिरायला जाणे यामुळे मुलांना घरातच आनंद मिळतो आणि त्यांना भ्रमणध्वनीची गरज वाटत नाही. मुलांच्या शाळेतील शिक्षकांशी बोलून त्यांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावे आणि त्यांना आवडणाऱ्या कलांमध्ये भाग घ्यायला लावावे. जर मुलांचे व्यसन खूपच वाढले असेल तर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा आणि धीराने त्यांना यातून बाहेर काढावे.

पाककला

मिक्स व्हेज भाजी

साहित्य : बटाटा २ मध्यम, गाजर १, फ्लॉवर १ वाटी, मटार १/२ वाटी, शिमला मिरची १, बारीक चिरलेला कांदा २, बारीक चिरलेला टोमॅटो २, आले-लसूण पेस्ट १ चमचा, हळद १/२ चमचा, लाल तिखट १ चमचा, धने पावडर १ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, मोहरी १/२ चमचा, हिंग चिमूटभर, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा, तेल २ चमचे, पाणी १ कप

कृती : बटाटा, गाजर सोलून मध्यम फोडी करून घ्या. फ्लॉवरचे तुरे सोडून घ्या. मटार सोलून घ्या. कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग घाला. जिरे तडतडले की कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परता. त्यात आले-लसूण पेस्ट घालून कच्चा वास जाईपर्यंत परता. आता टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात हळद, लाल तिखट, धने पावडर, मीठ घालून मिश्रण एकजीव करा. आता त्यात बटाटा, गाजर, फ्लॉवर, मटार, शिमला मिरची घालून २-३ मिनिटे परता. त्यात १ कप पाणी घालून झाकण ठेवून मध्यम आचेवर १०-१२ मिनिटे भाज्या मऊ होईपर्यंत शिजवा. शेवटी गरम मसाला आणि कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करा. तयार मिक्स व्हेज भाजी चपाती किंवा भाताबरोबर गरम सर्व्ह करा.

वास्तू

पती-पत्नीची बेडरुम

* पती-पत्नीचा बेडरूम नैऋत्य दिशेला असणे सर्वात शुभ मानले जाते. बेडसमोर मोठा आरसा लावू नये, यामुळे झोपेत व्यत्यय येतो आणि वैवाहिक जीवनात तणाव निर्माण होतो.

* तिजोरी किंवा पैशांचे कपाट नेहमी दक्षिण भिंतीला लागून असावे आणि त्याचे तोंड उत्तर दिशेला उघडेल असे ठेवावे. ही कुबेराची दिशा असल्याने धनवृद्धी होते.

सौंदर्य

* केसांना मेथी भिजवून वाटून लावल्यास कोंडा जातो.

* हातापायांची काळजी घेण्यासाठी रात्री मोहरीचे तेल चोळावे.

* गुलाबाच्या पाकळ्या दुधात वाटून ओठांवर लावल्यास ओठ गुलाबी होतात.

सल्ला

स्वयंपाकघरात नेहमी एक छोटी वही ठेवा, संपलेले सामान लगेच लिहा

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६

प्रबोधिनी (स्मार्त) एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.भा.०६।५७, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य

मेष : आज तुमच्या कामात अचानक प्रगती होईल.

वृषभ : आज आर्थिक बाबतीत चांगला दिवस राहील.

मिथुन : आज तुमच्या बोलण्यामुळे लोक प्रभावित होतील.

कर्क : आज कुटुंबासोबत वेळ चांगला जाईल.

सिंह : आज समाजात तुमचा मान-सन्मान वाढेल.

कन्या : आज कामाच्या ठिकाणी तुमचे कौतुक होईल.

तूळ : आज व्यवसायात मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : आज अडकलेल्या कामांना गती मिळेल.


धनु : आज प्रवासातून लाभ होण्याची शक्यता आहे.

मकर : आज मेहनतीचे चांगले फळ मिळेल.

कुंभ : आज नवीन ओळखी फायदेशीर ठरतील.

मीन : आज मन शांत आणि आनंदी राहील.

फिल्मीचक्कर क्र. १२६२ सौ. शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) 'का हेच प्रेम आहे?' या अर्थाचा हिंदी चित्रपट ५) बीस ++ बाद (चित्रपटाचे नाव) ७) एक +++ मै करूं एक सवाल तुम करो (गाणे) ८) राजकुमार, मीनाकुमारी यांचा एक सुंदर गाण्यांनी सजलेला एक चित्रपट १०) ऐश्वर्या रॉय, अक्षय खन्ना यांचा एक चित्रपट ११) धर्मेंद्र, रेखा, राजेंद्रनाथ यांचा एक चित्रपट १४) ++ चालली सासरला (चित्रपटाचे नाव) १६) ++ मेरे सपने (चित्रपटाचे नाव) १७) +++ समझा करो (चित्रपटाचे नाव)

उभे शब्द :- २) ++ रांझा चित्रपटाचे नाव ३) धर्मेंद्र, लीना चंदावरकर, जगदीप यांचा एक चित्रपट ४) मै ++ + ++ का शायर हूं (गाणे) ६) नायक संजय दत्तचा पहिला चित्रपट ८) ++ +++ + बडा नाम करेगा (गाणे) ९) भारत-चीन युद्धावर आधारित धर्मेंद्र, प्रिया राजवंश यांचा चित्रपट १०) ++ ओ ताकी ताकी ताकी ताकी रे (गाणे) १२) येऽऽ ++ गगन के तले धरती का प्यार फले (चित्रपटाचे नाव) १३) अभिनेत्री काजोलची अभिनेत्री आई १५) ++ तेरी गंगा मैली (चित्रपटाचे नाव)

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : अहंकारात बुडालेल्या माणसाला ना स्वतःची चूक दिसते ना दुसऱ्याचे चांगले गुण दिसतात.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

तुमच्यासारखी दिसणारी व्यक्ती आत्ताच कुठेतरी जगतेय, तुम्हाला माहितीये का?

जगात उंची आणि चेहरा या दोन्ही बाबतीत अगदी सारखी दिसणारी माणसे असतात का असा प्रश्न अनेकांना पडतो आणि याचे उत्तर समजून घेण्यासाठी आपल्याला माणसाच्या शरीराची रचना कशी तयार होते हे समजून घ्यावे लागते. प्रत्येक माणसाची उंची आणि चेहरा हा मुख्यत्वे त्याच्या आई वडिलांकडून मिळालेल्या जनुकांवर अवलंबून असतो. जनुकांमध्ये असलेल्या माहितीमुळे हाडांची लांबी, स्नायूंची रचना, चेहऱ्याच्या हाडांची ठेवण, नाकाचा आकार, डोळ्यांचा आकार, ओठांची ठेवण, कपाळाची रुंदी, हनुवटीचा आकार आणि त्वचेचा रंग ठरत असतो. जगात कोट्यवधी लोक राहत असल्यामुळे जनुकांचे काही ठराविक संच पुन्हा पुन्हा तयार होतात आणि त्यामुळे दोन अनोळखी माणसांमध्ये उंची आणि चेहऱ्यामध्ये खूप मोठे साम्य आढळून येते. म्हणजेच एखाद्या व्यक्तीची उंची पाच फूट आठ इंच असेल आणि चेहरा गोल असेल तर जगात कुठेतरी त्याच उंचीची आणि त्याच प्रकारच्या चेहऱ्याची दुसरी व्यक्ती असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अनेक वेळा आपण चित्रपटांमध्ये किंवा बातम्यांमध्ये पाहतो की एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीसारखी दिसणारी व्यक्ती सापडली आहे आणि तिची उंची, शरीरयष्टी आणि चेहरा इतका सारखा असतो की लोकांना खरा कोण आणि खोटा कोण हेच ओळखता येत नाही. अशा व्यक्तींना पाहून अनेकांना आश्चर्य वाटते कारण त्यांच्या केसांची शैली, चालण्याची पद्धत, बोलण्याची ढब आणि हसण्याची पद्धतही काही प्रमाणात सारखी वाटू शकते. परंतु याचा अर्थ असा होत नाही की ती दोन माणसे प्रत्येक बाबतीत पूर्णपणे सारखी असतात. जरी उंची आणि चेहरा सारखा दिसत असला तरी त्यांच्या शरीरावर असलेले तीळ, डाग, बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांची रचना, आवाजातील चढउतार, रक्तगट आणि रोगप्रतिकारक शक्ती ही मात्र पूर्णपणे वेगळी असते. विज्ञानामध्ये असे सांगितले जाते की दोन माणसांचे बोटांचे ठसे कधीही एकसारखे नसतात आणि डोळ्यांच्या बुबुळांची रचनाही कधीही एकसारखी नसते त्यामुळे बाहेरून कितीही साम्य वाटले तरी आतून ती माणसे वेगळीच असतात.

त्याचप्रमाणे त्यांचे विचार, आठवणी, भावना, सवयी, आवडी निवडी आणि जीवनातील अनुभव हेही वेगवेगळे असतात. एखादी व्यक्ती लहानपणापासून ज्या वातावरणात वाढते, जसे अन्न खाते, जसा व्यायाम करते त्याचाही तिच्या शरीरावर परिणाम होत असतो. त्यामुळे दोन माणसांची उंची जन्मतः सारखी असली तरी मोठे झाल्यावर खाण्यापिण्याच्या सवयींमुळे किंवा आजारांमुळे त्यांच्या उंचीत किंवा वजनात थोडा फरक पडू शकतो. तरीही साधारणपणे पाहता जगात उंची आणि चेहरा या दोन्हीत सारखी दिसणारी माणसे नक्कीच असतात आणि ती शोधली तर सापडूही शकतात. सोशल मीडियाच्या काळात तर हे अधिक सोपे झाले आहे कारण लोक आपले छायाचित्र टाकतात आणि संगणकाच्या मदतीने त्यांच्यासारखा चेहरा असलेली व्यक्ती शोधली जाते. अनेकांनी तर आपल्यासारखी दिसणारी व्यक्ती शोधून त्यांच्याबरोबर भेट घेऊन छायाचित्रे काढली आहेत आणि ती पाहून त्यांच्या स्वतःच्या घरच्यांनाही आश्चर्य वाटले आहे.

काही वेळा तर जुळी मुले नसतानाही दोन माणसे इतकी सारखी दिसतात की त्यांना जुळे समजले जाते. याला निसर्गाचा एक चमत्कारच म्हणावा लागेल कारण कोट्यवधी लोकांमध्ये जनुकांची पुनरावृत्ती होणे हे नैसर्गिक आहे. पूर्वी लोक असे म्हणत की प्रत्येक माणसाची जगात सात रूपे असतात आणि आधुनिक संशोधनही याला काही प्रमाणात दुजोरा देते. याचा अर्थ प्रत्येक माणसाची अगदी हुबेहूब प्रत असतेच असे नाही पण जवळपास सारखी दिसणारी माणसे नक्कीच असतात. त्यामुळे आपली उंची आणि चेहरा यामध्ये सारखी असणारी व्यक्ती जगात कुठेतरी आहे याची शक्यता खूप जास्त आहे आणि कधीतरी अचानक ती व्यक्ती आपल्यासमोर आली तर आपल्याला स्वतःलाच आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही.

हव्यास

एकदा अहमदनगर जवळ एका छोट्या गावात सोनू नावाचा मुलगा राहायचा. सोनू हुशार होता, पण त्याला एकच वाईट सवय होती - त्याला सगळं जास्तच पाहिजे असायचं. सोनूकडे एक छोटीशी किराणा दुकान होती. दुकान चांगलं चालायचं. रोज ५०० रुपये नफा व्हायचा. पण सोनूला ते कमी वाटायचं. एक दिवस त्याच्या दुकानात एक म्हातारा बाबा आला. बाबांनी

सोनूला एक छोटीशी बाटली दिली आणि म्हणाला, बाळा, ही जादूची बाटली आहे. रोज सकाळी या बाटलीतून एक थेंब टाकलास की तुझ्या दुकानातले सगळे डबे भरलेले राहतील. पण लक्षात ठेव, दिवसाला फक्त एकच थेंब टाकायचा सोनू खूप खुश झाला. दुसऱ्या दिवशी त्याने एक थेंब टाकला. काय चमत्कार! सगळे डबे भरले. साखर, डाळ, तांदूळ सगळं आपोआप भरलं. सोनूचा नफा रोज ५०० चा २००० झाला. पण सोनूचा लोभ वाढला. त्याला वाटलं, एक थेंबाने एवढं मिळतंय, तर पूर्ण बाटली ओतली तर मी एका दिवसात श्रीमंत होईन. एका रात्री त्याने लोभाने पूर्ण बाटली दुकानात ओतून टाकली.सकाळी उठून बघतो तर काय? दुकानात सगळीकडे फक्त साखरच साखर, डाळच डाळ पसरलेली. डबे फुटले, दुकानाचं छप्पर कोसळलं. सगळा माल खराब झाला. त्याचे जुने चांगले चालणारे दुकान पण गेले.

म्हातारा बाबा पुन्हा आला आणि म्हणाला, बाळा, एक थेंब तुला रोज पोट भरून देत होता, पण तुला सगळं एकाच वेळी पाहिजे होतं. लोभाने माणूस आहे ते पण गमावतो.सोनूला आपली चूक कळली. त्याने पुन्हा छोटंसं दुकान सुरू केलं आणि आहे त्यात समाधान मानायला शिकला.

बोध : लोभ हा माणसाचा सगळ्यात मोठा शत्रू आहे. थोडं मिळालं की त्यात खुश राहावं. जास्तच्या हव्यासापायी माणूस हातातलं पण गमावून बसतो.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

आपल्या चुकांची मीमांसा करणे ह्याचाच अर्थ हा की आम्ही आपणास आरशांत पाहिले पाहिजे. (स्वतःचे परीक्षण केले पाहिजे.) म्हणजे आपल्यातील दोष आपणांस कळून येतात. अहिंसा, सत्यपणा, पावित्र्य, नम्रता व निस्वार्थ सेवा इत्यादी गुणांची यादी करावी व त्याबाबत आपण कोठे असफल झालो त्याचे वर्गीकरण मानसिक, वाचिक वा कायिक अशा भागात करावे. तेव्हा आपणास कळून येईल की आपल्या चैतन्यमय मार्गात कोणकोणते अडथळे आहेत. असे हे परीक्षण आपणास कमी लेखण्यासाठी करावयाचे नसून ते स्वतःस अधिकाधिक सुधारणा करण्यासाठी करावयाचे आहे.

असे केल्याने आपण स्वतःस निराश, तिरस्कारीत करु नये तर आपण कोठे कमी पडलो हे लक्षात घेऊन तेथे पूर्णता मिळवून आपले आध्यात्मिक साध्य प्राप्त होण्यास त्याची मदत झाली पाहिजे. आमच्या स्थितीबाबत एकदा का आम्हाला पूर्णतः समजले तर आम्ही आ च्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करु शकतो व त्याचा हिशोब ठेवू शकतो. वेळोवेळी त्याचे पुनरावलोकन करु शकतो. प्रत्येक त्रुटीच्या भागात दोष पूर्णतः दूर करण्याचे साध्य ठरवू शकतो.

सर्व अवगुणांना आम्ही एकदम दूर करु शकू असे काही आपल्याला ठरविता येणार नाही. काही बदलण्यासाठी वेळ लागतो. जुन्या सवयी मोठ्या कष्टाने दूर होतात. आमची प्रगती मंद असू शकेल आणि तेही बरोबरच आहे. प्रत्येक दोषात बदल घडवून आणण्यासाठी जसे एक, दोन, तीन, चार अशा क्रमाने सुधारणा घडवू शकतो. एकेक विभाग घेऊन त्याला पूर्णतः सुधारून दुसऱ्या विभागाकडे वळावे लागेल. एकेक पाऊल टाकूनच आपल्याला पर्वत चढता येईल.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : नाही, कर्तव्य आणि संस्कार यांत बराच फरक आहे. वृद्ध आईवडिलांची काळजी घेणं ही मुलांची जबाबदारी आहे. पण प्रत्येक मुलगा हे कर्तव्य त्याच्या संस्कारांप्रमाणे पार पाडेल. एक मुलगा त्यांची मनापासून काळजी घेईल. तर दुसरा काळजी घेतल्याचं ढोंग करेल. तिसऱ्याला कदाचित त्यांची पर्वाही असणार नाही. काही जण तर त्यांच्या आजारी आईवडिलांना, तुम्ही चांगल्या डॉक्टरकडे जाऊन उपचार करून घ्या, मी फक्त पैसे भरेन, असं सांगतात.

सुरेश ओबेरॉय : एखादा मुलगा बिल भरायलाही नाही म्हणेल. कदाचित तो आईवडिलांना त्याच्या भावाकडून पैसे घ्यायला सांगेल.

शिवानीदीदी : हो, असंही होऊ शकतं.

नाती घट्ट विणू या

या बाबतीत वेगवेगळे प्रतिसाद आणि ऊर्जा असू शकतात. खूप जण ह्याला 'नशीब' असं संबोधतात. पण प्रत्यक्षात, दोन आत्म्यांमध्ये असणाऱ्या जुन्या कार्मिक खात्यानुसार नशीब ठरतं. या उदाहरणात, आईवडील आणि मुलांचे आत्मे यांच्या दरम्यान मागील ऊर्जेची देवाणघेवाण आहे. आपल्या कार्मिक खात्यामुळे जर आपण इतरांना देण्यासाठी बांधील असलो तर आपल्याला मनापासून द्यायची इच्छा निर्माण होईल किंवा कोणत्यातरी प्रकारे त्यांना देण्यासाठी कारण बनू.

'इतरांना मदत करूनही मला त्या बदल्यात काही मिळत नाही म्हणून पुढच्या वेळेस मी कोणालाही मदत करणार नाही' असं जरी आपण स्वतःला समजावलं तरी जेव्हा तशी परिस्थिती निर्माण होईल तेव्हा आपण पुन्हा इतरांना मदत करू. याचं कारण आपला देण्याचा संस्कार आणि आपलं कर्जबाजारी कार्मिक खातं आपोआपच त्यांची त्यांची भूमिका बजावतात.

सुरेश ओबेरॉय :

हो, मी असं घडताना पाहिलं आहे. माझ्या माहितीत आठ भावंडांचं एक कुटुंब आहे, ज्यांची कोर्टात केस चालू आहे. त्यांच्यातला एक भाऊ स्वतःहून सगळ्या कायदेशीर बाबींची काळजी घ्यायचा.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र : लग्नानंतर काय बदल झाला?

तो : आधी मी खोटं बोलायचो आणि ती विश्वास ठेवायची, आता ती खोटं बोलते आणि मला विश्वास ठेवावा लागतो.

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आंतरराष्ट्रीय बाल निधीचे मुख्यालय कोठे आहे?

- न्यूयॉर्क शहरात

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

बाळ गोलाकार फिरल्यासारखे वाटते. आपण बाळाची पाठ कोणत्या बाजूस, हातपाय कुठल्या बाजूस तसेच डोके कुठे आहे, हे ओळखू शकतो. या महिन्यापर्यंत बाळाची फुफ्फुसे कमजोर असतात; परंतु या महिन्यात बाळाचा जन्म झाला, तर ते आय. सी.यू. मध्ये ठेवून जगू शकते.

गर्भलांबी : १८ इंच, गर्भ वजन : १७०२ ग्रॅम.

नववा महिना : तस्मिन्नेक दिवसातिक्रान्तेऽ पिनवमं मासं । उपादाय प्रसवकालं आ दशमात् मासात् ।चरक शारीरस्थान (४-२५) नवव्या महिन्यामध्ये गर्भाची वाढ पूर्ण होऊन गर्भ प्रसूतीसाठी तयार होतो. गर्भाच्या फुफ्फुसाची पूर्ण वाढ होऊन ते त्यांचे कार्य करण्यास सक्षम होतात. या महिन्यात गर्भाची प्रत्येक आठवड्यात अर्ध्या पौंडांनी वाढ होते. प्रसूती गर्भाच्या कोणत्या अवयवांकडून होणार ते या महिन्यात ठरते; म्हणून या महिन्यात सोनोग्राफी करून प्रसूतीच्या वेळी मातेला काही अडचण आहे का हे बघून घ्यावे.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

साधारणतः बाळ डोक्याकडून बाहेर येते. गर्भलांबी : १९ ते २१ इंच, गर्भवजन : २६२२ ग्रॅम ते ३४६२ ग्रॅम

अशा तऱ्हेने गर्भाची ९ महिने शारीरिक वाढ आईच्या आहारातून निर्माण होणाऱ्या रसधातूपासून होत असते. गर्भाची मानसिक वाढ चांगली होण्यासाठी ध्यान-धारणा मंत्रोपचार, ॐकार उपयोगी ठरतात व यातून आपण बाळाचा बुद्धांक चांगल्या प्रकारे वाढवू शकतो.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



स्नेहांकुर दत्तक विधान केंद्रात पालकांची प्रतीक्षा करणारी मूक-बधीर आणि अन्य विशेष गरजा असलेली आशा तसेच आठ महिन्यांचा विशेष गरजयुक्त गणेश (बदललेले नावे) यांना समारंभपूर्वक त्यांच्या दत्तक पालकांकडे हस्तांतरित करण्यात आले.

मूकबधीर आशा अन् विशेष गरजयुक्त गणेशला मिळाले दत्तक पालक

नगर – गेली आठ वर्षेस्नेहालय संस्थेच्या स्नेहांकुर दत्तक विधान केंद्रात पालकांची प्रतीक्षा करणारी मूकबधीर आणि अन्य विशेष गरजा असलेली आशा तसेच आठ महिन्यांचा विशेष गरजयुक्त गणेश (बदललेले नावे) यांना समारंभपूर्वक त्यांच्या दत्तक पालकांकडे हस्तांतरित करण्यात आले. मूकबधिर आशाला अमेरिकेतील पालक मिळाले तर गणेश याला गुजरात मधील...

जिल्ह्याचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप, सहाय्यक धर्मादाय आयुक्त विशाल शेंडे, अडसूळ शैक्षणिक संकुलाचे संचालक डॉ. प्रदीप पाटील आणि प्राचार्य रियाज बेग, एचआयव्ही बाधित रुग्णांसह सर्व वंचित महिला बालकांच्या शस्त्रक्रिया नि:शुल्क करणारे डॉ. मुग्धा आणि डॉ. हर्षवर्धन तन्चर दाम्पत्य, योगेश मांडोत, बाल कल्याण समितीच्या सदस्य अनुराधा येवले आदींनी बालक आणि पालकांना आशीर्वाद दिले. आशाची श्रवण क्षमता सुधारण्यासाठी कॉकलर इनप्लांट शस्त्रक्रिया करणारे डॉ. गजानन काशीद तसेच विशेष गरजूक्त बालकांची काळजी घेणाऱ्या गृहमातांनाही यावेळी गौरविण्यात आले.

असा सुरू झाला आशाचा प्रवास

जन्मताना फक्त ८०० ग्रामचे वजन, श्रवण आणि वाचादोष, मिरगी (फिट्स) अशा असंख्य वैद्यकीय समस्या सोबत घेऊन आशा ५ सप्टेंबर २०१८ रोजी या जगात आली. बीड जिल्ह्यातून तिचे आई वडील तिच्यासह त्यांच्या तीन मुलांना घेऊन स्नेहांकुर केंद्रात आले. त्यात दोन नवजात जुळी बालके होती आणि एक चार वर्षांची एक मोठी मुलगी. या दांपत्याने सांगितले की, त्यांना प्रथम एक मुलगी झाली. त्यानंतर जुळी मुले झाली. जुळ्या मुलांपैकी एका मुलीची म्हणजे आशाची प्रकृती जन्मापासूनच चिंताजनक होती.

मूळ पालकांना संगोपन करणे होते अशक्य

या विशेष गरजयुक्त बालिकेच्या उपचारांसाठी लागणारे खर्च रोजंदारीवर जगणाऱ्या कुटुंबाला परवडणे शक्य नव्हते. त्यामुळे या आजारी बालिकेचा कायमचा स्वीकार करून जीवन वाचवण्याची विनंती त्यांनी स्नेहांकुरला केली. तिचा कायदेशीर परित्याग त्यांनी करून दिला. बालरोग तज्ञ डॉ. किशोर कवडे यांनी आशाला एकेका वैद्यकीय संकटातून बाहेर काढण्यास आरंभ केला. गेली सुमारे आठ वर्षे ही लढाई जारी होती. आशाची श्रवणक्षमता अजिबात नसल्याने असल्याने ती बोलू शकत नव्हती. तिला स्नेहांकुर टीमने साइन लँग्वेजसह अनेक कौशल्य शिकवण्याची शिकस्त केली. डॉ.काशिद यांनी ७ मार्च २०२५ रोजी कॉकलर इनप्लांटही महागडी शस्त्रक्रिया अल्प शुल्कात केली. स्नेहांकुरने आशाला स्पीच थेरपी, फिजिओथेरपी आणि अन्य उपचारांसाठी विविध रुग्णालयात रोज रुग्णालयात नेले.

संवादाचे माध्यम ठरले साइन लँग्वेज

तथापि आशासाठी संवादाचे माध्यम साइन लँग्वेज हेच राहिले. आशा करिता दत्तक कुटुंब आणि घर शोधण्याचे प्रयत्न भारतात यशस्वी होत नव्हते. आठ वर्षांनंतर अमेरिकन हवाई दलात वरिष्ठ अधिकारी असलेल्या मूळ भारतीय मातेने आशाला स्वीकारले. आपला भाऊ, आई अशा सर्वांसह ही माता आशाचा स्वीकार करण्यासाठी स्नेहांकुर मध्ये आली. आपल्या घरात येणारी मुलगी मूकबधिर असल्याने मागील एक वर्षापासून दत्तक माता आणि तिच्या सर्व कुटुंबाने शिकवणी लावून साईन लँग्वेज शिकली. दत्तक विधान सोहळ्यासाठी आलेला अमेरिकन परिवार आशाशी तिच्या भाषेत (म्हणजे साइन लँग्वेज मध्ये) बोलताना पाहून सर्वांनाच आश्चर्याचा सुखद धक्का बसला. लवकरच अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसी मधील जगातील सर्वोत्तम मूक बधिर विद्यालयात आशा शिक्षण घेणार आहे. तिचा तेथील प्रवेश भारतात येण्यापूर्वीच या कुटुंबाने निश्चित केला.

गणेशचे दत्तक पालक मूळ महाराष्ट्रातीलच

गणेश याचे पालक मूळ महाराष्ट्रातील असून गुजरातम ध्ये त्यांचा स्वतःचा व्यवसाय आहे. स्नेहांकुरमुळे आपले भविष्य बदलले, असे गणेशच्या दत्तक पालकांनी नमूद केले. स्नेहांकुर दत्तक विधान केंद्राच्या परिसस्पर्शाने घडलेला हा चमत्कार बालसेवेवरील समाजाचा विश्वास शतगुणित करतो, असे धर्मादाय उपायुक्त जगताप यांनी नमूद केले.

राजीव कुमार यांनी सूत्रसंचालन तर डॉ. प्राजक्ता कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. विश्वस्त रूपाली म्हणत, दत्ता पांचाळ, बाळू वारुळे, श्याम असावा आदींनी दत्तक सोहळ्याचे नियोजन केले.

प्रेरणादायी अक्षरधन

ध्येयनिष्ठा सोडण्यात अहित

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन: दिशान फिचर्स

डॉ. मधुकर अष्टीकर लिखीत नंदादीप

प्रतिभा ९८९०१५६६९५

नको बुवा काम घेणं. किती अडचणी येतील त्यात. पण अडचणींच्या केवळ भयाने कामच हाती नाही घ्यायचे, याला काय माणूस म्हणायचे ? काही मात्र असतात प्रारंभशूर. आल्या अडचणी, की त्यांनी झटकले काम. तरी काय चांगल्या माणसांचे लक्षण ? चांगली माणसे एकदा काम हाती घेतले की नाही टाकत मध्येच. अडचणी येतात, अपयशाची भीती दाखवितात. पण ते नाही कधी भीक घालीत अडचणींना.

एकदा बैठकीत गुळाचा खडा पडला. बाहेरून लगेच, एक मुंगळा आला. दोन बोटांच्या चुटकीने कुणीतरी उडविले त्याला दूर. पण क्षणात तो मुंगळा पुन्हा गुळाकडे आला. पुन्हा कुणीतरी त्याला बाजूला सारले. पण तो पुन्हा पुन्हा गुळाकडेच मुसंडी मारू लागला. गूळ गाठायचा हेच ध्येय, हे एकच लक्ष्य. लक्ष लक्ष अडचणी आल्या, तरी ध्येयाबाबत तो दक्षच. एकदा इतके जोराने उडविले. त्या मुंगळ्याला, की तो झाला कासावीस. उडवणारा झाला मग निःशंक. हसला समाधानाने. पण क्षणातच पाहतो तो गुळाच्या खड्यावर मुंगळा. ऐटीत शेंडी उंचावून रोवतो आहे पाय पक्के गुळावर. खुर्चीतला माणूस संतापला. त्याने मुंगळ्याला चिमटीत पकडला. पण हाय, करीत ओरडला. मुंगळा चावला. चावला? नव्हे ध्येयापासून परावृत्त करणाऱ्याला अद्दल घडवून बसला. खुर्चीतला घाबरला. मुंगळ्याला त्याने जोरात झटकला. ध्येयप्राप्तीच्या आड येणाऱ्याचे मुंगळ्याने रक्तच काढले आणि चिकटला पुन्हा त्या गुळालाच बेगाने. खुर्चीतला आता खूपच चिडला. त्याने मुंगळ्याला ओढला आणि हाती आला म्हणून तो आनंदला. पण पाहतो तो हाती अर्धाच मुंगळा. उरलेला अर्धा गुळालाच चिकटलेला.

ध्येयाला चिकटणेच मोलाचे. मुंगळ्यापासून माणसाने ते शिकायचे. संत तुकाराम महाराज म्हणतात,

कोणी निंदा कोणी वंदा।
आम्हा स्वहिताचा धंदा ।।
तुम्हासारिखे चालावे।
तेव्हा स्वहिता मुकावे ।।

हातचे स्वहिताचे काम न निंदेमुळे टाकावे, की वाहवा केली म्हणून स्वीकारावे. केवळ ध्येयनिष्ठेने वागावे. जे भयाने ध्येयापासून दूर होतात, त्यांच्यासारख्यापासून आपण दूर जावे. अन्यथा आपलेच अहित होईल.

पण माणसाला मुंगळ्यासारखा चिवटपणा, मनाची एकाग्रता साधेल का? का नाही? माणसात तो गुण आहे. बसची वाट पाहत स्टॉपवर उभी असलेली माणसे, एकचित्ताने, डोळे रोखून नाही का सारखी पाहत बसल्या येण्याच्या दिशेने? काय त्यांच्या पाहण्याने बस येते ? पण येताच मन कसे हरखते. ध्येय होते ना बस गाठण्याचे? फळ मिळाले ना एकाग्र चित्त केल्याचे. ध्येय गाठणे जणू एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करणे. म्हणून ध्येयप्राप्तीचा कैफ चढला पाहिजे. ज्याला कैफ नाही, धुंद, वेडे होणे नाही त्याच्या जीवनाला अर्थ नाही.

– किशोर गांधी

भूजल पातळी वाढविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना राबवा

दीर्घकालीन विचारातून पाण्याचे नियोजन करा; बचतीसाठी व्यापक जनजागृती करण्याचे सौ. स्वाती सिरसुल यांचे आवाहन

नगर – यंदा अत्यल्प पाऊस झाल्यामुळे राज्यातील अनेक भागांत भीषण दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. ऑक्टोबर महिन्यातच अनेक नद्या, ओढे, तलाव आणि धरणांनी तळ गाठल्याने आगामी सहा ते सात महिन्यांत पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेता शासनाने तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन जलनियोजनावर भर द्यावा. भूजल पातळी वाढविण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी शासनाकडे केली आहे.

यंदा कमी पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये भूजल पातळी खोल गेली असून, त्याचा परिणाम विहिरी, बोअरवेल, ओढे आणि नद्यांच्या पाणीपातळीवर झाला आहे. विशेषतः मराठवाड्यातील काही भागांत भूजल पातळी ४० ते ७० फुटांपर्यंत खाली गेल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दोन ते तीन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला, तरी भविष्यात टँकरसाठी पाण्याचे स्रोतच आटल्यास पाणीपुरवठा कसा करणार, हा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.



शहरी भागातील पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्ते आणि नाल्यांमधून वाहून जाते. सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांमुळे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. त्यामुळे सार्वजनिक, शासकीय तसेच खासगी इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविण्याची मोहीम शासनाने हाती घ्यावी. १०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या इमारतींवर पर्जन्यजल संकलन प्रणाली बसविण्याच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी. विशेष म्हणजे अनेक शासकीय इमारतींमध्येही या यंत्रणेचा अभाव असल्याचे दिसून येते. शासनाने स्वतःच्या कार्यालयांपासून या उपक्रमाची अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सुचविले.

पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना केवळ घोषणांपुरती मर्यादित न ठेवता तिची कायमस्वरूपी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, जमिनीत मुरवणे आणि त्याचा पुनर्वापर करणे ही प्रक्रिया प्रत्येक शहरात आणि गावात नियमितपणे राबविली पाहिजे. यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होऊन विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठा टिकून राहू शकतो. तसेच अतिवृष्टीच्या काळात रस्त्यांवर साचणाऱ्या पाण्याची समस्याही कमी होऊ शकते.

पाणी बचतीसाठी प्रत्येक नागरिकानेही जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. घरातील व सार्वजनिक नळांना तोट्या बसविणे, पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे, गाड्या धुणे व अंगणात सडा मारण्यासाठी होणारा अपव्यय रोखणे, मोठ्या इमारती आणि हॉटेलमधील जलवापरावर नियंत्रण ठेवणे अशा उपाययोजना कराव्यात. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच व्यापक जनजागृती मोहीम राबवावी.

अल्प पावसामुळे शेतीतील पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यातच पाणीटंचाई आणि महागाईचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक संघटनांनी एकत्रितपणे जलसंवर्धनाचे काम हाती घ्यावे. प्रत्येकाने पाण्याचा थेंब न् थेंब जपला आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या, तरच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करता येईल, असे सौ. स्वाती सिरसुल यांनी म्हटले आहे.

सांस्कृतिक चळवळीत मसापच्या सावेडी शाखेचे योगदान कौतुकास्पद

नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन

नगर – महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या राज्यभरातील शाखांपैकी सावेडी ही एकमेव शाखा आहे, जी दरवर्षी दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित करते. यामुळेच वारसा अल्पावधीत राज्यातील साहित्य रसिकांच्या पसंतीस उतरला आहे. नगर जिल्ह्याच्या साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीमध्ये सावेडी शाखेचे योगदान मोलाचे असून, हे कार्य भविष्यातही असेच अखंडपणे चालू ठेवले जाईल, असे प्रतिपादन मसापच्या सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.



महाराष्ट्र साहित्य परिषद सावेडी शाखेच्या वतीने वारसा दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, लेखिका मेधाताई काळे, सुरेश चव्हाण, मसाप विभागीय कार्यवाह जयंत येलूलकर, मसाप जिल्हाप्रमुख प्रा. गणेश भगत, कविवर्य चंद्रकांत पालवे, सतिष डेरेकर, ल.धो खराडे आदी.

महाराष्ट्र साहित्य परिषद सावेडी उपनगर शाखा व शांतिकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या ११ व्या वारसा दिवाळी अंकाचे प्रकाशन फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आले. हा सोहळा आयरिश सभागृह येथे झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिका मेधाताई काळे होत्या. यावेळी मसापचे जिल्हा प्रमुख प्रा. गणेश भगत, सुरेश चव्हाण यांची उपस्थिती होती.

फिरोदिया पुढे बोलतांना म्हणाले की, आजची तरुणाई सोशल मीडिया कडून पुन्हा प्रिंट मिडिया कडे आकर्षित होतेय याबद्दल समाधान व्यक्त करताना उत्तम साहित्य वाचनाचा आपल्याला नेहमीच खरा आनंद मिळत असतो. अध्यक्षीय भाषणात प्रा. काळे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सावेडी शाखेच्या माध्यमातून होणाऱ्या चौफेर साहित्यिक कार्याचा गौरव केला.

प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर यांनी प्रास्ताविकात वारसा दिवाळी अंकाच्या निर्मितीमागची भूमिका आणि सावेडी शाखेच्या उपक्रमांचा आढावा घेतला.

यावेळी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, प्रा.गणेश भगत, इतिहास संशोधक प्रा.नवनाथ वाव्हळ यांचीही भाषणे झाली.

या सोहळ्याला शाखेचे पदाधिकारी विजय पिंपरकर, स्नेहल उपाध्ये, सतीश डेरेकर यांच्यासह रेखाचित्रकार ज्योती डेरेकर, डॉ.चंद्रकांत जोशी, ल.धो.खराडे, ज्योतिषाचार्य संजय कुलकर्णी, जालिंदर बोरुडे, शब्बीर शेख, प्राची थिगळे, कवयित्री सरोज आल्हाट, उद्योजक राजन उत्तेकर, भानुदास महानूर, एम. पी. दिवाण, दिलीप शहापूरकर, सूर्यकांत थिगळे तसेच वारसा अंकातील लेखक, कवी आणि नगरमधील रसिक वाचक उपस्थित होते.

सूत्रसंचालन तेजा पाठक यांनी तर आभार सुदर्शन कुलकर्णी यांनी मानले.



सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागातील गौरी प्रशांत दळवी आणि सात्विक निशांत दातीर हे दोन्ही विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) या परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

एनएमएमएस परीक्षेत श्री समर्थ विद्यामंदिरचे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

नगर – सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक यशाची परंपरा कायम राखत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत यश संपादन केले आहे. प्रशालेतील गौरी प्रशांत दळवी आणि सात्विक निशांत दातीर हे दोन्ही विद्यार्थी या परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

राष्ट्रीय स्तरावरील या परीक्षेत यश मिळवत दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली आहे. त्यांच्या या यशामुळे प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली असून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशाबद्दल श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, माध्यमिक विभागाच्या शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या वसुधा जोशी, पर्यवेक्षिका शारदा होशिंग तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिवमहापुराण कथा सप्ताहात व्यासपीठावर साकारला शिव-पार्वती विवाह सोहळा

ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या वाणीतून विवाह सोहळ्याचे निरूपण; भक्तांचा सहभाग

नगर – दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचा चौथा दिवस भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून शिव-पार्वती विवाह सोहळ्याचे निरूपण केले. या कथेनिमित्त व्यासपीठावर पारंपरिक पद्धतीने शिव-पार्वती विवाह सोहळा मोठ्या उत्साहात साकारण्यात आला. पुष्पवृष्टी, मंगलमय वातावरण आणि भाविकांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

भगवान शंकर आणि माता पार्वती यांचा विवाह सोहळा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि मंगलमय सोहळा मानला जातो. हा विवाह प्रेम, श्रद्धा, त्याग, तपश्चर्या आणि समर्पणाचे प्रतीक आहे. भगवान शिव हे वैराग्याचे, तर माता पार्वती या शक्तीचे प्रतीक मानल्या जातात. शिव आणि शक्ती यांच्या मिलनातून सृष्टीच्या संतुलनाचा संदेश मिळतो. या सोहळ्यातून कुटुंबव्यवस्था, संस्कार आणि धार्मिक परंपरांचे महत्त्व अधोरेखित होते.

माता पार्वती यांनी भगवान शिव यांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या भक्तीने आणि निष्ठेने प्रसन्न होऊन भगवान शिव यांनी त्यांचा विवाह स्वीकारला. हिमालय पर्वतावर भगवान शिव आणि माता पार्वती यांचा दिव्य विवाह सोहळा संपन्न झाला. हा सोहळा प्रेम, शक्ती, भक्ती आणि समर्पणाचा पवित्र संगम आहे. भाविकांना सुखी वैवाहिक जीवन, कौटुंबिक एकता आणि आध्यात्मिक शांतीचा संदेश या विवाह सोहळ्यातून मिळतो.





समाजाच्या कल्याणासाठी काम करा

जगाच्या कल्याणासाठी महादेवांनी विवाह केला. धार्मिकतेतून संस्कारित पिढी निर्माण होते. गळ्यात माळ घालून लोकांचा काटा काढणे, याच्याइतके पाप दुसरे नाही. जोपर्यंत घरातील माणूस आपल्यासोबत असतो, तोपर्यंत त्याची किंमत कळत नाही. त्यामुळे थोडेच जगा, पण चांगले जगा; बेईमानीचे जीवन जगू नका. देवासमोर लावलेला दिवा मनाला प्रकाश देतो. आपला श्वासदेखील मनाच्या नियंत्रणाशी जोडलेला आहे. त्यामुळे समाजात वावरताना समाजाच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे, असे प्रतिपादन ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी केले.

राजकीय पदाधिकारी व भाविक उपस्थित

शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या चौथ्या दिवशी शिव-पार्वती विवाह सोहळ्याचे निरूपण आणि प्रत्यक्ष विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार संग्राम जगताप, धनश्री सुजय विखे पाटील, छायाताई फिरोदिया, व्याख्याते गणेश शिंदे, राजाभाऊ मुळे, राजेंद्र बलदोटा, नगरसेवक महेश लोंढे, रवींद्र बारस्कर, संभाजी पवार, महेंद्र बिज्ञा, बाबासाहेब सानप, अनिल जोशी, अशोक गायकवाड, विश्व हिंदू परिषदेचे गजेंद्र सोनवणे, अमोल भांबरकर, हरिभाऊ डोळसे, राहुल जामगावकर, प्रितम मुथा, मुकुल गंधे, पद्मावती बोरुडे, वैभव कोटा, मनीष लोढा, अमोल भंडारे, महेश कुलकर्णी आदींसह भाविक उपस्थित होते.

शिवभक्तांचा आनंद गगनात मावेनासा

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शिवमहापुराण कथेतून भाविकांनी धार्मिकतेचे चांगले विचार घेऊन जावेत. या विचारांच्या माध्यमातून संस्कारित पिढी घडविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून दिल्लीगेट येथे आयोजित शिवमहापुराण कथेच्या माध्यमातून व्यासपीठावर प्रत्यक्ष शिव-पार्वती विवाह सोहळ्याचा धार्मिक उत्सव साकारण्यात आला. शिवभक्तांचा आनंद गगनात मावेनासा झाला असून, असे भक्तिमय दृश्य पाहायला मिळाले, असे त्यांनी सांगितले.

समाजाने संस्कृतीकडे पुन्हा वळावे

धनश्री विखे म्हणाल्या की, सध्याच्या सामाजिक वातावरणात तरुण पिढीवर चुकीचे संस्कार होताना पाहायला मिळत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने धार्मिकतेचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. कथेची संस्कृती महान असून तिचे निरूपण होणे गरजेचे आहे. समाजाने आपल्या संस्कृतीकडे पुन्हा वळावे. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी शिवमहापुराण कथेच्या माध्यमातून भक्तीचा संदेश देण्याचे कार्य केले आहे, असे त्यांनी नमूद केले.

आमदारांनी पार पाडली पार्वतीच्या मामाची भूमिका

शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या चौथ्या दिवशी शिव-पार्वती विवाह सोहळा पारंपरिक आणि धार्मिक वातावरणात उत्साहात झाला. विवाह सोहळ्यावेळी पुष्पवृष्टी करण्यात आली. या सोहळ्यात आमदार संग्राम जगताप यांनी पार्वतीच्या मामाची भूमिका पार पाडली. विवाह सोहळ्याच्या आनंदात सहभागी होत भाविकांनी फुगडी खेळण्याचाही आनंद घेतला. भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण सोहळ्याला रंगत आली.

राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांचा अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी दौरा

जिल्हा बँकेचे संचालक खासदार नीलेश लंके यांचा २२ नोव्हेंबर रोजी सत्कार, नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर



जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक जिल्हाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत पार पडली.

नगर – अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक जिल्हाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी किसनराव लोटके, निलेश मालपाणी, हरिदास शिर्के, रघुआबा काळदाते, शरद पवार, अर्चना गायकवाड, राजेश्वरी कोठावळे, सुरज मोरे, अभिजीत ससाणे, भगवानराव गोरखे, दत्तात्रय डोकडे, प्रकाश पोटे, समीर पठाण, माऊली हिरवे, गणेश तोडमल, रोहन शेलार, शामराव नागवडे, यांचेसह अहिल्यानगर दक्षिण पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे हे अहिल्यानगर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दुष्काळी गावांची पाहणी दौरा करणार आहेत. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि पाणीटंचाई परिस्थिती पाहणार आहेत तसेच अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व विविध सामाजिक संघटनेच्या वतीने खा. निलेश लंके यांची अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल २२ नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह, अहिल्यानगर येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे यांनी दिली.

या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने या बैठकीत खालीलप्रमाणे नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली:

शामराव तात्यासाहेब नागवडे – जिल्हा उपाध्यक्ष (श्रीगोंदा), सुदाम ज्ञानदेव नवले – जिल्हा उपाध्यक्ष (श्रीगोंदा), सुहास नारायण कासार जिल्हा उपाध्यक्ष (नगर), दत्तात्रय पांडुरंग डोकडे – जिल्हा सरचिटणीस (नगर), विश्वास गुलाबराव जाधव – जिल्हा सरचिटणीस (नगर), रामदास भानुदास ससे जिल्हा संघटक (नगर)

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे जिल्हाध्यक्ष काकडे व खासदार निलेश लंके यांनी अभिनंदन केले. तसेच, सर्वांनी एकजुटीने कामाला लागून पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवावेत आणि प्रदेशाध्यक्षांचा आगामी दौरा यशस्वी करावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले. या बैठकीस जिल्ह्यातील इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नगरमध्ये २१ नोव्हेंबर रोजी मोफत मराठा वधुवर मेळावा

अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेचा उपक्रम

नगर – नगर शहरामध्ये अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेच्या वतीने आयोजित मोफत मराठा वधुवर परिचय मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेवक योगीराज गाडे यांनी केले आहे. हा मेळावा नगर शहरामध्ये हॉटेल यश ग्रँण्ड येथे (रेल्वे स्टेशन जवळ) २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. या मेळाव्यासाठी शिवसेना माजी जिल्हाप्रमुख व विद्यमान जिल्हा संघटक प्रा.शशिकांत गाडे व यश उदयोग समूहाचे संचालक रमाकांत (नाना) गाडे यांचे सहकार्य लाभत आहे.

मराठा सोयरीक संस्थेचा हा ११३ वा मोफत मेळावा असल्याची माहिती शिक्षक सेनेचे शहर जिल्हाध्यक्ष पारुनाथ ढोकळे, भारतीय कामगार सेनेचे राज्य सहचिटणीस मधुकर निकम, मराठा सोयरीक संस्थेच्या संचलिका जयश्री अशोक कुटे, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, शिव गौरव मराठा उद्योग संघाचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र औताडे, प्रकाश जोंधळे, अंजना पठारे, संपतराव सोनवणे, मराठासेवक मनोज सोनवणे, उदय अनुभुले, शांतीलाल कोहक, मोहन हेलकुटे, प्रमोद झावरे, नानासाहेब दानवे, प्रा. योगेश कोतकर, ॲड. संदीप काळे, उज्वला शेळके, अन्नपूर्णा ढम, अनिल अकोलकर, सागर मोरे यांनी दिली आहे.

जगदंब फाउंडेशन अंतर्गत धर्मादाय कार्यालयामध्ये नाव नोंदणी केलेली मराठा सोयरिक संस्था ही महाराष्ट्रातील शासनमान्य अशी विश्वसनीय वधुवर सुचक संस्था आहे. तसेच जगदंब फाउंडेशन हे एकल महिला, अनाथ, निराधार मुलांसाठी भरीव सामाजिक कार्य करत आहे. या वधुवर संस्थेचे आतापर्यंत ११२ मोफत वधु वर मेळावे झालेले आहेत. तसेच ५००० पेक्षा जास्त लग्न संस्थेकडून जमलेले आहेत. या मेळाव्यासाठी अहिल्यानगर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, मुंबई इत्यादी वेगवेगळ्या जिल्ह्यातून अनेक वधु-वर पालक उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यामध्ये वधूवरांना व पालकांना समोरासमोर स्थळ बघण्याची व चर्चा करण्याची संधी यामध्ये आहे.

अधिक माहितीसाठी ७४४७७८५९१० च्या नंबर वर संपर्क करावा.

तसेच संस्थेचा पुढील मेळावा हा २९ नोव्हेंबर रोजी राहता तालुक्यात होणार असल्याची माहिती संस्थेने दिली आहे. वधू-वर पालकांनी मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

कॉंकरोच जनता पार्टीची महाराष्ट्र समन्वय समिती जाहीर

अहिल्यानगरच्या क्षितिज पगार व सुशीलकुमार शेळके यांना राज्य कार्यकारिणीत स्थान





नगर – आगामी काळातील राजकीय आव्हाने पेलण्यासाठी आणि महाराष्ट्रातील संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने कॉंकरोच जनता पार्टीने महाराष्ट्र राज्य समन्वय समितीची अधिकृत घोषणा केली आहे. राज्यभर पक्षाचे जाळे विस्तारणे, जनसंपर्क वाढवणे आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढा देत पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवणे, या प्रमुख उद्देशाने ही १५ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये महाराष्ट्रातील विविध विभाग आणि जिल्ह्यांतील क्रियाशील कार्यकर्त्यांना समान प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. यासोबतच संघटनात्मक कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी पश्चिम झोनच्या प्रभारीपदी अहिल्यानगरचे क्षितिज पगार व राज्य समन्वय समितीच्या सदस्यपदी सुशीलकुमार शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य समन्वय समितीचे नवनियुक्त सदस्य पुढीलप्रमाणेः अमोल असुलकर, भरत बनैत, धारा मोरे, क्रांती, महिया गौरखेडे, मयूर मालखेडे, पायल सातदेवे, प्रज्वल कसबे, प्रणय अहिरे, प्रतिक पितांबरे, राका हेते, साहिल पारसेकर, सम्राट सोनवणे, सुशील शेळके, त्रिशा पुडके.

कॉंकरोच जनता पार्टीने महाराष्ट्रासोबतच देशभरातील विविध राज्यांमध्ये आणि विभागांमध्ये संघटनात्मक बांधणीला मोठी गती दिली आहे. पक्षबांधणीच्या या मोहिमेअंतर्गत देशभरात झोन स्तरावरील महत्त्वपूर्ण नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, हरियाणा, राजस्थान आणि जम्मू-काश्मीर आदी प्रमुख राज्यांच्या समन्वय समित्याही पक्षाकडून जाहीर करण्यात आल्या आहेत.

समितीची आगामी काळातील प्रमुख उद्दिष्टे जिल्हास्तरीय मजबुतीकरण असून राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यात पक्षाचे संघटन अधिक सक्रिय करणे. तरुणांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका: स्थानिक पातळीवरील बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य आणि नागरी समस्यांना वाचा फोडून न्याय मिळवून देणे.नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांना पक्षाच्या विचारधारेशी जोडणे आणि युवा वर्गाला नेतृत्वाची संधी देणे.

कायद्याचे शिक्षण घेताना नियमित वाचन, कल्पनाशक्तीचा वापर करावा

ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांचे प्रतिपादन; समर्थ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ



समर्थ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभात विधितज्ज्ञ ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांचे व्याख्यान झाले.

नगर – कायद्याचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी नियमित वाचन, सर्वांगीण ज्ञान आणि चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. वकिली व्यवसायात केवळ कायद्याचे ज्ञान पुरेसे नसून कल्पनाशक्तीचा प्रभावी वापर करून प्रत्येक प्रकरणाचा विविध अंगांनी विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असे प्रतिपादन विधितज्ज्ञ ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांनी केले.

बेल्हे (ता. जुन्नर) येथील समर्थ विधी महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात ते बोलत होते. यावेळी ॲड. सुद्रिक म्हणाले की, फौजदारी न्यायालयातील कामकाज प्रभावीपणे हाताळण्यासाठी वकिलांनी प्रत्येक प्रकरणाचा सर्वंकष अभ्यास करणे गरजेचे आहे. न्यायालयीन कामकाजाबरोबरच समाजातील विविध क्षेत्रांचे ज्ञान वकिलांना असणे आवश्यक आहे. सामाजिक भान राखून तसेच पक्षकाराच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून वकिलांनी आपली जबाबदारी पार पाडावी. सातत्यपूर्ण वाचन आणि व्यापक दृष्टिकोन यामुळेच कायद्याच्या क्षेत्रात प्रभावी काम करता येते.

विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेपुरते शिक्षण न घेता प्रत्यक्ष व्यवहारातील अनुभव, सामाजिक परिस्थिती आणि न्यायव्यवस्थेतील बारकावे समजून घ्यावेत. प्रत्येक विषयाकडे चिकित्सक नजरेने पाहण्याची सवय लावावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संस्थाध्यक्ष वसंत शेळके, उपाध्यक्ष माउली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, स्नेहल शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कवडे, डॉ. राजीव सावंत आदी उपस्थित होते. याप्रसंगी ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांचा प्राचार्य डॉ. सुनील कवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ॲड. सुद्रिक यांचे राज्यातील हे २३ वे कायदे विषयक व्याख्यान होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विधी शाखेतील नवोदित विद्यार्थ्यांना कायद्याच्या अभ्यासासोबतच वकिली व्यवसायातील सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली.

सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे नगरमध्ये २० नोव्हेंबरला 'एमएसएमआय कर्ज आऊट्रीच कार्यक्रमाचे आयोजन



नरेशकुमार दुबे

नगर – व्यापाऱ्यांना व लघु-मध्यम उद्योजकांना व्यवसाय वाढीसाठी सुलभ व जलद वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने अहिल्यानगर क्षेत्रात एमएसएमआय नॅशनल वाईड क्रेडिट आऊट्रीच अभियान २०२६ अंतर्गत विशेष कर्ज आऊट्रीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम २० नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता मी हॉल एमआयडीसी, नागपूर अहिल्यानगर. तसेच नगर-पुणे रोड, ईस्पिरा हॉल सफलता सुपा एमआयडीसी, ता. पारनेर, जि.अहिल्यानगर येथे होणार आहे.

या कॅम्पमध्ये उद्योजकांना आकर्षक व्याजदर व्यवसायाच्या वाढीसाठी स्पर्धात्मक व आकर्षक व्याजदरासह तातडीच्या व्यावसायिक गरजांसाठी कर्ज सुविधा उपलब्ध असणार आहे. यामुळे उद्योगातील खर्च कमी करून अधिकाधिक बचत करण्याची संधी मिळणार आहे अशी माहिती क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांनी दिली.

कॅम्पमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन व्यवसायाला योग्य दिशा देण्याची सुविधा. मायक्रो बिझनेस, कॉन्ट्रॅक्टर कर्ज, इंजिनिअरिंग कर्ज, हॉटेल कर्ज, ऊर्जा कार्यक्षमता कर्ज, वाहन व्यवसाय कर्ज, जीएसटी कर्ज यांसह विविध एमएसएमआय कर्ज योजनांचा लाभ घेता येणार आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून परिसरातील उद्योजक व व्यवसायिकांनी सहभागी होऊन यासंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

श्री संकटमोचन हनुमान मंदिरात अन्नकूट व छप्पन भोग महोत्सव





नगर – गुलमोहर रोड, मार्कंडेय सोसायटी येथील संकटमोचन हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने दिव्य अन्नकूट व छप्पन भोग महोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने भगवान श्रीकृष्ण यांना ५६ प्रकारच्या विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी हनुमान चालीसाचे पठण, भजनसंध्या, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला भाविकांनी उपस्थिती लावली.

भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला, त्यावेळी त्यांना ५६ प्रकारचे नैवेद्य अर्पण करण्यात आले होते, अशी धार्मिक मान्यता आहे. याच परंपरेनुसार दिव्य अन्नकूट व छप्पन भोग महोत्सव संपूर्ण भारतात उत्साहात साजरा केला जातो. हा महोत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून भक्ती, श्रद्धा, अन्नदान, सेवा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम आहे. देवाला अर्पण केलेला प्रसाद भाविकांना वाटप करून आनंद आणि भक्तिभावाचा प्रसार केला जातो.

मार्कंडेय सोसायटी, गुलमोहर रोड येथील श्री संकटमोचन हनुमान मंदिरात मंडळाच्या वतीने हा उत्सव पारंपरिक आणि धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला. सर्व भक्तांच्या वतीने ५६ प्रकारच्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर हनुमान चालीसा पठण, भजनसंध्या, महाआरती आणि भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्येष्ठ सदस्य गोपाल धोकरीया, अशोक खंडेलवाल, हिम्मत खंडेलवाल, हर्षद आनेचा, अजय खंडेलवाल, पवन खंडेलवाल, कमलेश खंडेलवाल आदींनी परिश्रम घेतले. तसेच महोत्सवासाठी प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष सहकार्य करणारे सर्व भाविक भक्तांचे मंडळाचे वतीने आभार व्यक्त करण्यात आले. मंडळाच्या वतीने दर मंगळवारी रात्री ८ ते ९ या वेळेत सामूहिक हनुमान चालीसाचे पठणाचे आयोजन करण्याव येते. या अनुष्ठानात भाविक सहभाग घेतात.

फक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी मोफत पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण

नगर – प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजूर, ता.अकोले, जि. अहिल्यानगर या कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र मवेशी, ता. अकोले जि. अहिल्यानगर येथे फक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी ४ महिने कालावधीचे पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणाचे निवासी व भोजन व्यवस्थेसह मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

१ डिसेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत आयोजित प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी फक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी प्रशिक्षणास आवश्यक पात्रता पुढीलप्रमाणे – १) आवश्यक कागदपत्रे: इ.१२ वी उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, रहिवाशी दाखला किंवा रेशन कार्ड, डोमीसाईल दाखला. ४ (चार) पासपोर्ट साईज फोटो., २) शारीरिक पात्रता: वजन किमान ५० कि.ग्रॅ. असावे तसेच वय १८ ते २६ वर्षे व उंची कमीत कमी १६५ से.मी. असावी., ३) निवड पध्दत : शारीरिक क्षमता चाचणी १६०० मिटर रनींग (मार्क-५०), लेखी परीक्षा (मार्क-५०) एकूण १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांची निवड मेरीटनुसार करण्यात येईल., ४) २६ नोव्हेबर २०२६ पर्यंतच उमेदवारांचे ऑफलाईन अर्ज स्विकारले जातील. त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी. (अर्ज भरावयाचे व जमा करावयाचे ठिकाण :- पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र मवेशी, ता.अकोले, जि. अहिल्यानगर). अर्ज भरलेल्या इच्छुक पात्र उमेदवारांनी २७ नोव्हेंबर रोजी सदर परीक्षेसाठी पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र मवेशी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे सकाळी १० वाजता मूळ व झेरॉक्स कागदपत्रांसह उपस्थित राहावे असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजुर, ता. अकोले, जि.अहिल्यानगरचे प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे. माहितीसाठी ९४२१५२५४१६ /८२७५३४९४१४ /९९६०११ २६०० या संपर्क साधावा.



कनोजिया परदेशी समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कनोजिया परदेशी समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – नगर येथील कनोजिया परदेशी समाजातर्फे सत्यनारायण महापुजा व महाप्रसादाचे आयोजन महासैनिक लॉन येथे केले होते. महापुजेला ६२ वर्षे पूर्ण झाली. या कार्यक्रमाला समाज बांधव उपस्थित होते.

गेल्या २२ वर्षापासून समाजातील मुलांचा शैक्षणिक दर्जा वाढावा यासाठी या दिवशी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. या वर्षातील विविध इयत्तामध्ये चांगले गुण प्राप्त केल्याबद्दल एकूण ४० विद्यार्थ्यांना परदेशी परिवारातर्फे स्मृतीचिन्ह व समाजातर्फे रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

यावेळी इयत्ता दहावीमध्ये ९५% गुण प्राप्त केल्याबद्दल नुपुर रोहित परदेशी हिचा स्व. गुलाबचंद कनोजिया परिवार व नंदलाल कनोजिया यांच्या तर्फे स्मृती चिन्ह व रोख रक्कम देवून विशेष सन्मान करण्यात आला. तसेच उच्च शिक्षण प्राप्त केल्याबद्दल नंदिनी दिनेश कनोजिया, स्नेहा संजय कनोजिया, पलक सचिन परदेशी यांचा व पावर लिफ्टींग चॅम्पीयनशिप स्पर्धेतील राज्यस्तरीय खेळाडू मयंक सुरजप्रकाश कनोजिया यांचाही राजु बलीराम परदेशी यांच्यातर्फे स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

सेवानिवृत्त झाल्याबद्दल सुदेश लाला परदेशी व गोविद गुलाब कनोजिया यांचा स्मृती चिन्ह, श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी महाप्रसादाची व्यवस्था अजय कनोजिया परीवारातर्फे करण्यात आली होती.

या प्रसंगी प्रा.डॉ. केवलकृष्ण कनोजिया, राजकुमार परदेशी, राजेंद्र कनोजिया, हिरालाल परदेशी, दिनेश चौधरी, प्यारेलाल कनोजिया, दिनेश परदेशी, सूरज कनोजिया आदिसह समाजातील बंधू-भगिनी उपस्थित होत्या.

गोविंद कनोजिया यांनी सुत्रसंचालन केले. मंच व्यवस्थापन तसेच कार्यक्रम व्यवस्थेसाठी ठाकूरदास परदेशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

राष्ट्रीय टेबलटेनिस स्पर्धेसाठी सागर पंचारिया यांची निवड



टेबल टेनिस राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याबद्दल सागर पंचारिया यांचे अभिनंदन करताना पोस्टल संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव. समवेत सुनील कुलकर्णी, रुपाली पाडळकर आदी.

नगर- भारतीय डाक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी अहिल्यानगर डाक विभागात सिस्टिम ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून कार्यरत असलेले क्रीडापटू सागर शिवकुमार पंचारिया यांची महाराष्ट्र संघातून अकराव्यांदा निवड झाली आहे. मुंबई येथील मुंबई जीपीओमध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय निवड चाचणीत त्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत राष्ट्रीय स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले.

मुंबई जीपीओ येथे आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय निवड चाचणीत राज्यातील तीसपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील पाच खेळाडूंची निवड करण्यात आली. यामध्ये मधुकर लोणारे (पुणे), राज शिंदे (मुंबई), नरेंद्र चिपळूणकर (मुंबई), सागर पंचारिया (अहिल्यानगर) आणि श्रीधर उन्हाळे (नाशिक) यांचा समावेश आहे.

१६ ते २० डिसेंबर या कालावधीत गुवाहाटी (आसाम) येथे राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धा पार पडणार आहेत. या स्पर्धेत सागर पंचारिया महाराष्ट्र संघातुन सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, डाक विभागाच्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी सागर पंचारिया यांची अकराव्यांदा निवड होणे ही त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीची, खेळाप्रती असलेल्या निष्ठेची आणि जिद्दीची पोचपावती आहे. शासकीय कार्यालयातील दैनंदिन कामकाजाची जबाबदारी सांभाळतानाच त्यांनी टेबल टेनिसचा नियमित सराव सुरू ठेवला आहे. कामाचा व्याप आणि वेळेची मर्यादा यांवर मात करून त्यांनी क्रीडा क्षेत्रातील आपली गुणवत्ता सातत्याने सिद्ध केली आहे.

या यशाबद्दल पोस्टल संघटनेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव, पोस्टल सोसायटीचे चेअरमन कमलेश मिरगणे, संघटनेचे विभागीय अध्यक्ष रावसाहेब चौधरी, ऋषिकेश कार्ले, नितीन थोरवे, सचिन राशीनकर, सचिन थोरवे, सुनील कुलकर्णी, दिपक देवकर, रुपाली पाडळकर, छाया साबळे, नंदू साळवे आदींनी अभिनंदन केले.

धम्माल मनोरंजन

दिनविशेष २० नोव्हेंबर

१६०२: ऑट्टो फोन ग्वेरिक जर्मन भौतिकशास्त्रज्ञ यांचा जन्म.१७५०: टिपू सुलतानफ म्हैसूर चा राजा यांचा जन्म. (मृत्यू: ४ मे १७९९)

१८१९: मोनियर मोनियर-विल्यम्सफ भाषाशास्त्रज्ञ आणि शब्दकोश संकलक यांचा जन्म.१८५४: मोरो गणेश लोंढे कवी, निबंधकार व नाटकाकर यांचा जन्म.१८८०: पांडुरंग महादेव बापटफ भारतीय क्रांतिकारी यांचा जन्म. १८८९: एडविन हबलफ अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ यांचा जन्म. (मृत्यू: २८ सप्टेंबर १९५३) १८९२: जेम्स कॉलिप इंसुलिन चे सहसंशोधक यांचा जन्म. (मृत्यू: १९ जून १९६५)१८९६: सलीम अलीफ भारतीय पक्षीशास्त्रज्ञ यांचा जन्म१९०५: मिनू मसानीफ संसदपटू, अर्थतज्ञ, घटनापंडित यांचा जन्म. (मृत्यू: २७ मे १९९८)

१९१०: विलेम जेकब व्हान स्टॉकमडचफ भौतिकशास्त्र यांचा जन्म.१९२४: बेनुवा मँडेलब्रॉटफ फ्रेंच गणितज्ञ यांचा जन्म.१९२७: चंद्रशेखर धर्माधिकारी न्यायमूर्ती यांचा जन्म.१९३९: वसंत पोतदार साहित्यिक यांचा जन्म. (मृत्यू: ३० एप्रिल २००३)

१९४१: हसीना मोईन उर्दू लेखिका यांचा जन्म. १९६३: तिमोथी गॉवर्स इंग्लिश गणितज्ञ यांचा जन्म. १९६९: शिल्पा शिरोडकर अभिनेत्री यांचा जन्म. १९८९: प्रजनेश गुणेश्वरन भारतीय टेनिसपटू यांचा जन्म. मृत्यू :१८५९: माऊंट स्टुअर्ट एल्फिस्ट स्कॉटिश मुत्सद्दी, हिन्दुस्थानातील मुंबई प्रांताचे गवर्नर, कुशल प्रशासक व इतिहासकार यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १७७९)

१९०८: कन्हय्यालाल दत्त बंगालमधील क्रांतिकारक यांना फाशी.

१९१०: लिओ टॉलस्टॉयफ रशियन साहित्यिक यांचे निधन. (जन्म; ९ सप्टेंबर १८२८)

१९५४: क्लाइड व्हर्नन सेसेनाफ सेसेना एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनचे संस्थापक यांचे निधन. (जन्म: ५ डिसेंबर १८७९)

१९७०: यशवंत खुशाल देशपांडे ख्यातनाम मराठी संशोधक यांचे निधन. (जन्म: १४ जुलै १८८४)


१९७३: केशव सीताराम ठाकरे पत्रकार व समाजसुधारक यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १८८५)

१९८४: फैज अहमद फैज लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी १९११)

१९८९: हिराबाई बडोदेकर किराणा घराण्याच्या प्रसिद्ध गायिका यांचे निधन. (जन्म: १९ मे १९०५)

१९९७: शांताराम शिवराम सावरकर स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांचे स्वीय सहाय्यक यांचे निधन. १९९८: दत्तात्रेयशास्त्री तांबे गुरूजी संस्कृतच्या विविध शास्त्रांतील पंडित, प्रख्यात मीमांसक यांचे निधन. २००३: डेव्हिड डेकोफ सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकचे पहिले राष्ट्राध्यक्ष यांचे निधन. (जन्म: २४ मार्च १९३०) २००७: इयान स्मिथ रोडेशिया देशाचे पहिले पंतप्रधान यांचे निधन. (जन्म: ८ एप्रिल १९१९)

महाशब्दकोडे



आडवे संकेत

१) वाफेने चालणारे जहाज
४) एक टुथपेस्ट कंपनी
८) अशा प्रकारचा
१०) ब्रह्मांड, सृष्टी
११) पावसाळ्यातील मंत्र्यांचे अधिवेशन
१४) मोठी जाड सूई
१६) मिथिलेचा एक राजा
१७) दात
२१) जिले मुले आहे ती
२३) आमिष
२५) सुख, शांती
२६) हादरा २७) एक लवचिक वस्तू २८) सहा चा टोला
३१) बाहेर ३२) माया, हव्यास, एक वृक्ष ३३) बिना का गीतमाला आता या नावाने आहे
३५) विचार, दुःख (हिं.)
३७) गाठण्याचे काम करणारा
४०) गजाआड, बंदी ४१) मृदू
४२) ढोरमेहनत ४५) टॅक्स, कर ४६) पायात घालतात त्या
४८) ताई, मोठी बहिण
४९) विठ्ठलाचा अवतार विटेवरी पाय
५१) दिव्यांची माला
५२) जाड लेखणी
५३) बाजारबुणगे ५४) प्राण

उभे संकेत

२) हत्ती ३) भिंतीतले खिंडार, तळघर
४) शंकर, हर ५) वेळू, बांबू
६) हृदय ७) उणे विरुद्ध
८) रोड, कमताकद
९) अल्प, लहान
११) दोन शेतातून गेलेला रस्ता
१२) अधिक, आणखी
१३) पुर्वीची स्थिती बदलवून नवीन स्थिती तयार करणारा महात्मा १५) ओहोटी विरुद्ध १८) अस्वल १९) षडाननाची आई २०) मर्द चित्रपटाचा निर्माता २२) वडी, गोळी २३) लांबलचक, कंटाळा आणण्याजोगे
२४) एक अंमली पदार्थ
२५) एकूण एक २९) दिल्लीत स्थित एक वाहन, एक प्रकारची घोडागाडी ३०) आवड दाखविणारा
३४) किरकोळ, छोटे-मोठे
३६) कातिन (हिं.) ३७) ब्रेड
३८) हाताने काढलेले, भरतकाम ३९) मोठा दगड
४०) सात पावलांची सप्तपदी तर आठ पावलांची....
४३) दो आँखे
(चित्रपट) ४४) माघार
४७) रवा, साखर पासून बनविलेला चिकट पदार्थ
४८) तिरुपती
४९) कारले हे असते
५०) पोळी शेकण्याचे साधन

मागील उत्तर

		अ	फ	रा	त	फ	र			स	त्य	म
का	वा	सा	की		वा	र	बि	ला	सी	नी		यु
झी		मा	र	का		क		ल			बा	रा
रं		न्य					वै		सा	ज		
गां	गा		मा	मा		अं	ध	क			मा	ता
	जा	य	या	ची	जा	त		र	स	म	ला	ई
आ	वा		जा		ग	र	ज	वं	त			
स	जा		ध		रु	पा		द	ल	ब	द	लू
रा		दे	व		क	ट	क		ज	र		
	अ	शा		ब			ल			ड	ग	ला
चा	प	ट	पो	ळी		लो	क	व	न		र	ग
	ज	न	क	रा	जा		ला		व	सा		व
को	य			जा		का	ट	क	स	र		ड



१) अंधारात चमकण्याच्या गुणधर्मास काय म्हणतात?
अ)फ्ल्युअरसन्स ब) फॉस्फोराईट
क)कोल्ड फ्लेम ड) फॉस्फरसन्स

२) दृष्टिवैशम्य कोणत्या दोषामुळे होते?
अ)पारपटल ब)नेत्रभिंग क)पीत बिंदु ड)दृष्टिपटल

३) इलेक्ट्रॉनचा शोध कोणी लावला?
अ)थॉमसन ब)प्लँक क)मिलिकान ड)अँडरसन

४) विद्युत शक्ती कशामध्ये मोजतात?
अ)व्होल्ट ब)वॅट क)अॅम्पीअर ड)कुलंब

५) खालीलपैकी कोणत्या पदार्थाची विशिष्ट उष्णता सर्वात जास्त आहे?अ)पाणीब)पारा क)तांबे ड)हायड्रोजन

६) खालीलपैकी कोणत्या ऊर्जा साधनाद्वारे सर्वात स्वस्त आणि चोवीस तास ऊर्जा मिळते?
अ)जैविक वायू ब) धबधबा
क)सोलार सेल्स ड) पवन चक्की

७) समुद्राची खोली मोजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तरंगलहरी कोणत्या प्रकारात मोडतात?
अ)व्हिझीबल ब)इन्फ्रारेड
क)अल्ट्रासॉनिक ड)अल्ट्रा व्हायोलेट

८) सूर्याची ऊर्जा निर्मिती कशामुळे होते?
अ) हायड्रोजन अणुंच्या विभाजनामुळे
ब) हायड्रोजन अणुंच्या एकत्रीकरणामुळे
क) हेलियम अणूंच्या एकत्रीकरणामुळे
ड) युरेनियम अणुच्या विभाजनामुळे

९) मूळ वस्तूच्या हुबेहूब प्रतिकृतीस काय म्हणतात?
अ)बहुरुपिक ब)समजातीय
क)होलोग्राफ ड) होमी ओमीओमॉर्फ

१०) एकर्णीय प्रकाश शलाका जेव्हा गोलकामधून (प्रिझम) जाते तेव्हा घडणारा परिणाम कोणता?
अ)धृवण ब)अपस्करण क)विवर्तन ड)विचलन

११) मंद वाहक उपकरणांच्या उत्पादनासाठी खालीलपैकी कोणता पदार्थ वापरतात?
अ)प्लास्टिक ब)जर्मेनियम क)काच ड) तांबे

१२) हवेतील ध्वनीचा वेग किती असतो?
अ)३३१ से.मी./सेकंद ब)३३१ मी./सेकंद
क)३२० मी./सेकंद ड) ३१३ से.मी./सेकंद

१३) निर्मळ पाण्याच्या निर्जंतुकीकरणासाठी खालीलपैकी कोणता उपाय जास्त प्रभावी आहे?
अ)आयोडिन ब)अतिनील किरण
क) क्लोरिनेशन ड) ब्रोमीन

१४) पुढे उल्लेखिलेल्या द्रव्यांतील विद्युत उपघटनी द्रव्य कोणते?
अ) Nacl ब) $CaCl_2$ क) CC_{i4} ड) $AlCl_2$

१५) अनुवंशिकतेची मूळतत्त्वे कोणी शोधून काढली?
अ) मॉर्गन ब)वाइसमन क)लॅमार्क ड) मेंडेल

१६) प्रकाश किरणाच्या सप्तरंगी पट्ट्यात कोणत्या रंगाची तरंग लांबी सर्वात कमी आहे?
अ)जांभळा ब)निळा क)हिरवा ड) तांबडा

१७) पेनिसिलीनचा शोध कोणी लावला?
अ) लुई पाश्चर ब)एडवर्ड जेन्नर
क)अलेक्झांडर फ्लेमिंग ड)पॉब हेन्री स्पाक


१८) मध्यांक काढण्यासाठी कोणता आलेख वापरतात?
अ)बहुभुजाकृती संचयी वारंवारता वक्र
ब) वारंवारता क)रेखांकित ड)स्तंभालेख

१९) अतिथंड हवामानात पाण्याचे नळ का फुटतात?
अ)थंड हवेत नळाचे सांधे कमजोर होतात.
ब)कमी उष्ण तापमानात पाण्याचे नळ ठिसूळ होतात
क) पाण्याचे बर्फ होताना ते प्रसरण पावते
ड)थंड हवेमध्ये पाणी जोरात वाहते

२०)कात्री ही कोणत्या प्रकारच्या तरफेचे उदाहरण आहे?
अ)तिसऱ्या ब) दुसऱ्या क)पहिल्या ड) यापैकी नाही

उत्तर: (१-ड), (२-अ), (३-अ), (४-ड), (५-ब), (६-ड), (७-अ), (८-अ), (९-ब), (१०-ड), (११-क), (१२-ब), (१३-ड), (१४-क), (१५-क), (१६- क), (१७-क), (१८-क), (१९-ब), (२०-क)





आडवे संकेत

१) सन् १९९८ में टी.एल.वि. प्रसाद निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और मधू थे.
५) सन् १९९३ में रमेश तलवार निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर, संजय दत्त और माधूरी दीक्षीत थे.
८) दुल्हन हम ले जायेंगे इस फिल्म में करिश्मा कपूर का नाम.
९) दादागिरी इस फिल्म में मिथून चक्रवर्ती की हिरोईन.
११) सन् १९८८ में हरीश शाह निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र और रती अग्निहोत्री थे. १३) चंद्रन (अभिनेत्री)
१४) खान (अभिनेता)
१६) सन् १९८२ में अजित सिंह नारंग ने बनाई इस फिल्म में धर्मेंद्र और हेमा मालिनी थे. १७) सन् १९९३ में प्रमोद चक्रवर्ती ने बनाई इस फिल्म में अक्षय कुमार और करिश्मा कपूर थे.
१८) सन् १९५८ में बनी सोने की चिडीया इस फिल्म का अभिनेता.
२०) सन् १९९८ में सुनील अग्निहोत्री निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और रविना टंडन थे.
२१) अंदर बाहर इस फिल्म की एक अभिनेत्री.
२२) चलो चले मितवा तेरी उची निची राहों में.... यह गीत इस फिल्म का है.
२४) सन् १९९८ में मनिरत्नम निर्देशित इस फिल्म में शाहरुख खान, प्रिती झिंटा और मनिषा कोईराला थे.
२५) सन् १९८९ में अजिज सेजावल निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र, मिथून चक्रवर्ती, संजय दत्त, राखी, माधूरी दीक्षीत और अमृता सिंह थे.
२७) सन् १९८१ में रमेश तलवार निर्देशित इस फिल्म में शशी कपूर और रेखा थे.
२८) के लिए कुछ भी करेगा (फिल्म)
२९) हर किसीको नही मिलता यहां प्यार जिंदगी में.... यह गीत इस फिल्म का है.
३१) सन् १९९३ में के.सी. बोकाडिया निर्देशित इस फिल्म में विवेक मुश्रान, अजय देवगन और प्रतिभा सिन्हा थे.
३३) अजग देवगन, सुनील शेट्टी, रिया सेन और रविना टपंडन अभिनीत फिल्म.
३५) सन् १९९४ में शोमू मुखर्जी ने बनाई इस फिल्म में सलमान खान और मनिषा कोईराला थे.

उभे संकेत

१) सन् १९८० में स्वरुपकुमार निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और योगिता बाली थे.
२) बने चाहे दुश्मन जमाना हमारा सलामत रहेगा हमारा.... (गीत)
३) सन् १९८५ में सुबोध मुखर्जीने बनाई इस फिल्म में राज बब्बर और रती अग्निहोत्री थे.
४) सन् १९९६ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर, अरबाज खान और जुही चावला थे.
५) वो दिन (फिल्म)
६) सन् २००० में राज कंवर निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल और रानी मुखर्जी थे.
७) सन् १९९५ में राज कंवर निर्देशित

फिल्मी शब्दकोडे

इस फिल्म में अनिल कपूर और श्रीदेवी थे.
१०) सामने जीगर के पास.... (गीत)
११) सन् १९७२ में नरेंद्र बेदी निर्देशित इस फिल्म में रणधीर कपूर और जया भादुडी थे.
१२) सन् १९९८ में दीपक सरीन निर्देशित इस फिल्म में सलमान खान और ट्विंकल खन्ना थे.
१३) सन् १९८२ में चंदर बहल निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और रंजीता थे. १५) जीना है प्यार में जिना मरना है प्यार में मरना.... यह गाना इस फिल्म का है. १६) सन् १९८६ में अजय कश्यप निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और अनिता रॉय थे.
१९) अभिनेता दिलीपकुमार की अभिनेत्री पत्नी.
२३) सन् १९८४ में सावन कुमार निर्देशित इस फिल्म में सुनील दत्त, अनिल कपूर और पुनम ढिल्लो थे.
२४) सन् १९९९ में प्रकाश झा निर्देशित इस फिल्म में अजय देवगन, काजोल और महिमा चौधरी थे. २६) और आशिक (फिल्म)
३०) जीगर इस फिल्म में करिश्मा कपूर का नाम. ३२) सन् १९९४ में रामगोपाल वर्मा निर्देशित इस फिल्म में व्यंकटेश और श्रीदेवी थे. ३४) हर सवाल का जवाब नही मिल सकता मेरे प्यार का हिसाब.... यह गीत इस फिल्म का है.

मागील फिल्मी उत्तर

खु	न	ब	हा	गं	गा	मे		स	र	फि	रा	
न		ल		गा		ज		ल		जा		ह
का	र	वा		कि	शो	र	कु	मा	र		ग	म
क		न	म	क		सा		न		ब	द	ला
र्ज				स		ब	र	खा	ब	हा	र	
	ते	रे	ना	म				न	ज	र		तु
	री		सि			अ			रं		प्रे	म
ए	क	औ	र	सि	कं	द	र		ग	र	म	
	स		हु			ना		ज	ब		वि	
रा	म		सै	म	स	न		मि	ली		वा	
स्ते		जी	न	त		सा	ज	न		क	ह	र
	जी			वा		मी				स		वि
अं	त	रा	मा	ली			दि	वा	ना	म	स्ता	ना

विनोद

त्यापैकी एकाला वेटरने जवळ बोलावले व खुंटीवरील कोट काढून त्याच्या अंगावर चढविला. त्या इसमाने खुश होऊन वेटरला दोन रुपयांची बिदागी दिली.

दुसऱ्या इसमाने विचारले, 'अरे, एवढी बिदागी कशाला दिलीस?'

'काय? दोन रुपयांत हा कोट महाग आहे?' पहिल्या इसमाने सवाल केला.

पाहुण्याने अंगणात प्रवेश करताच कुत्रा भुकंत त्यांच्या अंगावर गेला. पाहूणा जागच्या जागी थांबला.

'अहो, या। कुत्र्याला घाबरु नका।' मालकाने आतून आवाज दिला.

पाहुणा : 'अहो, हा चावणार तर नाही ना?'

घरमालक : 'मला हेच पाहायचे आहे. या कुत्र्याला मी आजच विकत आणला आहे.'

मर्चंटस् को ऑप. बँकेच्या सभासदांना 'सुवर्ण महोत्सवी' वर्षानिमित्त ५१०० रूपयांच्या मुदत ठेव पावतींचे २४ नोव्हेंबर रोजी होणार वितरण

संचालक मंडळाच्या निर्धारामुळे सभासदांना ऐतिहासिक व संस्मरणीय भेट : चेअरमन संजय चोपडा



हस्तीमल मुनोत संजय चोपडा अमित मुथा अनिल पोखरणा

नगर – अहमदनगर मर्चंट्स को ऑप. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती भेट दिली जाणार आहे. या मुदत ठेव पावती वितरणाचा ऐतिहासिक शुभारंभ सोहळा २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती बँकेचे चेअरमन संजय चोपडा यांनी दिली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे भूषविणार आहेत. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल चांदमल मुनोत यांच्या हस्ते सभासदांना मुदत ठेव पावतीचे वितरण केले जाईल. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार संग्राम जगताप यांची विशेष उपस्थिती असेल.

बँकेने यापूर्वी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना २५०० रूपयांची ठेव पावती तर ४१ व्या वर्षानिमित्त ४१०० रूपयांची ठेव पावतीची भेट दिली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार सर्व मापदंडाचे बँकेने कटाक्षाने पालन करून ठेवीदारांचे व सभासदांचे हित जपण्यास प्राधान्य दिलेले आहे. या अनुषंगाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नुकताच बँकेला शेड्युल्ड दर्जा दिला. बँकेच्या चांगल्या कामामुळे व वाढत्या कामकाजाच्या आलेखामुळे होणाऱ्या प्रगतीप्रती लेखापरीक्षणामध्ये सतत 'अ' वर्ग मिळत आहे व त्याची पोचपावती म्हणून बँकेस नेहमी पुरस्कार मिळत असतात याचा मला अभिमान वाटतो. आता माझ्या चेअरमन पदाच्या कार्यकाळात सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्यात येत आहे व संस्थापक व विद्यमान संचालक हस्तीमल मुनोत यांचे सभासदांना रक्कम रूपये ५१०० ची मुदत ठेव पावती देण्याबाबतचे स्वप्न पूर्ण करण्यात माझाही हातभार लागला, याचा मला विशेष आनंद वाटतो, असे संजय चोपडा यांनी सांगितले.

सुवर्णमहोत्सवी वर्ष विशेष समितीचे स्वागताध्यक्ष अनिल पोखरणा यांनी सांगितले की, मर्चंट्स बँकेचा सुवर्ण महोत्सवी समारंभ केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी त्यांच्या हस्ते संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांना 'सहकार यात्री' उपाधीने सन्मानित करण्यात आले होते. त्याचवेळी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती देण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर मूळ प्रस्ताव काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे नामंजूर झाला होता. परंतु बँकेच्या यशस्वी वाटचालीत व प्रगतीत सभासदांच्या विश्वासाचे असलेले योगदान लक्षात घेऊन चेअरमन संजय चोपडा व माझे सर्व सहकारी संचालक मंडळाने निर्धार पूर्वक सकारात्मक व ठाम भूमिका घेतली. त्यानुसार ना. बाबासाहेब पाटील यांच्यासमवेत आ. संग्राम जगताप यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे व त्यांच्या सहकार्यामुळे सदरच्या प्रस्तावास परवानगी मिळविण्यास यश आले. परिणामी सभासदांना ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती देण्याचा मार्ग मोकळा झाला. ३१ मार्च २०१४ आधीच्या सर्व सभासदांना ही ठेव पावतीची ऐतिहासिक भेट मिळणार आहे. यासाठी सुमारे ४ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात येऊन लवकरच सदर मुदत ठेव पावत्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी सांगितले की, प्रस्ताव नामंजूर झाला तरी सर्व संचालक मंडळाने सभासदांप्रती असलेली कटीबध्दता जपत सुवर्ण महोत्सवी वर्ष मुदत ठेव पावतीचा विषय मार्गी लावला. या ठाम भूमिकेचे सहकार क्षेत्रातून स्वागत व कौतुक होत आहे. या ठेव पावती वितरण सोहळ्यास सभासद, ग्राहक, हितचिंतकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सुवर्णमहोत्सवी वर्ष कमिटीचे अध्यक्ष अनिल पोखरणा, व्हाईस चेअरमन अमित मुथा, सदस्य तथा संचालक आनंदराम मुनोत, विजय कोथिंबीरे, संजीव गांधी, सीए मोहन बरमेचा, श्रीमती मीनाताई मुनोत, संजय बोरा व सर्व संचालक मंडळाचे सदस्य तसेच बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य, महिला व बालविकास कल्याण-अंतर्गत कमिटीच्या सदस्या सौ. मनिषाताई गुगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी व कर्मचारी यांनी केले आहे.

सोळा वर्षाखालील मुलांची २१ व २२ नोव्हेंबर रोजी क्रिकेट निवड चाचणी

नगर – महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून होणाऱ्या १६ वर्षाखालील मुलांची अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट निवड चाचणी २१ व २२ नोव्हेंबर रोजी वाडिया पार्क येथील बॅडमिंटन हॉलच्या शेजारील जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार असल्याची माहिती जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी दिली.

ज्या खेळाडूचे वय १३ वर्ष पूर्ण झालेले आहे अशाच खेळाडूंना प्रवेश देण्यात येणार आहे. ज्यांचे वय ११, १२ व १३ वर्ष आतील असेल त्यांना या निवड चाचणीत भाग घेता येणार नाही. १ सप्टेंबर २०११ नंतरची व ३१ ऑगस्ट २०१३ च्या आतील जन्मतारीख असणे आवश्यक आहे. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते १०:३० या वेळात ग्रामीण भागातील खेळाडुंची निवड चाचणी होईल, तर २२ नोव्हेंबर रोजी याच वेळात शहरी भागातील खेळाडुंची निवड चाचणी होईल. नोंदणी शुल्क २०० रूपये असेल. अटी व नियम पात्र असणाऱ्या खेळाडूंनाच सदर वेळेत पालकांनी पाठवावे.

गुरुवाणी - ११६

सूड भावना नसावी...

जेव्हा शेतीत पीक येतं तेव्हा कापणीची तयारी होते. एकदा कापणी झाल्यावर शेत उजाड दिसते. वेळेनुसार आपण एखादी गोष्ट करतो नंतर ती सोडून देतो. एखादा प्रेरणा देणारा आला तर आपण प्रभावित होतो, तो गेला की आपण पूर्वपदावर येतो. पण धर्माशी कायम जोडले गेले पाहिजे. काम झाले की साधना सोडून देणे चुकीचे आहे. केशी श्रमण या गोष्टी राजा प्रदेशीला समजून सांगतात. राजा प्रदेशी म्हणतो, मी वेळ, परिस्थिती आणि आवश्यकतेचा गुलाम बनणार नाही. राजा प्रदेशी म्हणतो, 'माझ्याकडे ७ हजार गाव आहे. त्याचे चार विभाग करेल. यातील एक विभागात मी धर्मशाळा, भोजन शाळा उभारेल.तिथे कोणीही आले तरी उपाशी राहणार नाही'. अशी व्यवस्था करून राजा प्रदेशी साधनेत मग्न झाला. हे पाहून त्याची सूर्यकांता राणी अस्वस्थ झाली. तिची भावना तयार झाली की, राजा प्रदेशीला आता माझ्यात इंटरेस्ट नाही राहिला. खरं तर पती पत्नी दोघांनीही एकत्रित धर्म मार्गावर चालणे आवश्यक असते. जेव्हा तुमचा साथी, जोडीदार तुमचा शत्रू बनतो तेव्हा तो खूप भयंकर असतो. राणी राजा प्रदेशीला मारण्याचे ठरवून स्वतःच्या मुलाला आपल्या पक्षात ओढून घेते. मुलाला सांगते, राजाला मारून तू राजा बन. मुलगा हे ऐकून कोणताही प्रतिसाद न देता निघून जातो. पण राणी प्रतिशोधाच्या मार्गावर चालत असते. महाभारत हा एक सूडाचा प्रवास आहे. हा सर्व विनाशाचा मार्ग आहे. राणी स्वतःच राजाला प्रदेशीला मारण्याचे ठरवते. राजा पौषध करत असतो. राणी ते पाहते आणि ठरवते हीच संधी आहे. ती पारणा करताना त्याच्या आहारात विष टाकते.राजाला कळते आपण विष ग्रहण करतोय. तो शांतचित्ताने पारणा करतो. तो पौषधशाळेत जाऊन सर्व जीवांची क्षमायाचना करतो. या परिस्थितीतही त्याच्या मनात राणी विषयी द्वेष नसतो. ही असते खरी साधना. तो समाधीस्थ होऊन आयुष्य पूर्ण करतो व देव बनतो. नगरमधील समर्पण चातुर्मासाचा गोवर्धन पर्वत उचलण्यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे. यात प्रियदर्शनी बहु मंडळाने खूप काम केले आहे. सावेडी, नगर दोन्हीं बहु मंडळ, सारसनगर महिला मंडळ, बालिका, युथ मंडळ, महावीर नगर आनंद सखी मंडळ, माणिक नगर बहु मंडळ, 'हायजिन'च्या वैशाली गांधी, अतिथींची उत्तम व्यवस्था करणारी समिती, अकाउंटची चोख व्यवस्था सांभाळणारी समिती, शिबिर व्यवस्थेसाठी योगदान देणारे अशा सर्वांचेच मी अभिनंदन करतो.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

नोटीस

नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्ट, अहिल्यानगर रजि. नं. एक १७ या ट्रस्टच्या मिळकतीमधील सर्व भाडेकरूंना सदर नोटीशीद्वारे अंतिम संधी देण्यात येते की, आपणास यापूर्वी अनेकवेळा आपल्या कब्जात असलेल्या जागेचे भाडे जमा करण्याबाबत तोंडी व दि. १५/१०/२०२६ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस देण्यात आली होती. तथापी अनेक भाडेकरुनी अद्यापही थकबाकी व चालू भाडे भरलेले नाही. त्यांनी १० दिवसात आपल्यावर असलेले थकीत व चालू भाडे ट्रस्टचे अधिकृत कार्यालय मिसगर लायब्ररी, मौलाना आझाद रोड, बेलदार गल्ली, अहिल्यानगर येथे येऊन चेकने आपले थकबाकी व चालू भाडे भरुन रितसर अधिकृत पोचपावती घ्यावी. तसेच भाडे भरताना आपल्याकडे असलेला भाडेकरारनाम्याची मूळ प्रत सोबत घेवून यावे. ज्या भाडेकरूंकडे करारनामा नाही त्यांनी ट्रस्टच्या अधिकृत कार्यालयात अर्ज करून नवीन भाडेकरारनामा करून घ्यावे. यापुढे भाडेकरारनामा करण्यासाठी कोणत्याही प्रकारची संधी देण्यात येणार नाही.

नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्टची लालटकी, तेलीखुंट, शहाजी रोड, गंजबाजार (बादशाह मस्जिदजवळ), गांधी मैदान (गुलाम अली मस्जिद जवळ) आणि रेल्वे स्टेशन येथे असलेली मिळकतीचे व्यवहार व करार आणि हस्तांतरण करुन घेऊ नये. अन्यथा ट्रस्टचे भाडेकरु असणारी व इतर कोणत्याही व्यक्तीला सदर ट्रस्टच्या मालकीच्या जागेमध्ये त्याच्या नावे भाडेपट्टा पावती नसल्यास सदर जागेवरुन त्वरित काढून सदरची जागा ताब्यात घेण्यात येईल. बेकायदेशीर भाडेकरुकडून वाचविण्याकरीता तसेच ट्रस्टने मिळकतीची जागा, इमारत व दुकान भाडयाने दिली आहे. अशा भाडेकरूंना सोडून इतर कोणीही ट्रस्टच्या मिळकतीचा गैरवापर ट्रस्टच्या परवानगीशिवाय करताना दिसून आल्यास त्यांना दिलेला भाडेकरारनामा रद्द करुन ट्रस्टमार्फत मिळकतीवर टाळा लावून बंद करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. यानंतर आपणास संधी देण्यात येणार नाही व त्यांचे दुकान व जागा कायदेशीर कार्यवाही करुन ट्रस्टच्या ताब्यात घेण्यात येईल.

ठिकाण :- अहिल्यानगर, दिनांक :- १८/११/२०२६
पत्ता :- १२४८/४९, मिसगर लायब्ररी, मौलाना आझाद रोड, बेलदार गल्ली, अहिल्यानगर

रेहान शफी काझी – जनरल सेक्रेटरी
इनामउल्ला जिक्रीया खान – सेक्रेटरी, मिसगर एज्युकेशन बोर्ड
वाजीद जावेद खान (खजिनदार)
इफतेखार अकिल अहमद खान (ट्रस्टी)
नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्ट, अहिल्यानगर

संत आन्ना चर्च मध्ये २१ नोव्हेंबर रोजी ५० वी रौप्यमहोत्सवी मत माऊली यात्रा



नगर – शहरातील संत आन्ना चर्च येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक ५० व्या रौप्यमहोत्सवी नगर मत माऊली यात्रेचा धार्मिक सोहळा २१ नोव्हेंबर रोजी भक्तिभावात आणि उत्साहात होणार आहे. गेल्या पाच दशकांपासून अखंड सुरू असलेली ही भक्तिमय परंपरा यंदा सुवर्णमहोत्सवी टप्प्यावर पोहोचली असून, ख्रिस्ती समाजासाठी हा क्षण अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि आध्यात्मिक महत्त्वाचा ठरणार आहे.

मरीया मातेवरील अतूट श्रद्धा, भक्ती, प्रार्थना आणि एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या यात्रेत अहिल्यानगर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच पुणे आणि मुंबई येथून हजारो भाविक सहभागी होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांच्या उपस्थितीत मरीया मातेचा जयघोष, प्रार्थना आणि भक्तिगीतांच्या माध्यमातून संपूर्ण परिसर भक्तिमय होणार आहे. यात्रेच्या कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ३.३० वाजता बॉईज हायस्कूलच्या मैदानापासून निघणाऱ्या मिरवणुकीने होणार आहे. विविध धार्मिक पथके, भक्तिगीते आणि प्रार्थनेच्या वातावरणात मार्गक्रमण करणारी ही मिरवणूक संत आन्ना चर्च येथे पोहोचणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता पवित्र मिस्साचा धार्मिक सोहळा होईल. या पवित्र मिस्सामध्ये भाविक सामूहिक प्रार्थना करून मरीया मातेचे आशीर्वाद घेणार आहेत.

गेल्या ५० वर्षांत नगर मत माऊली यात्रेने केवळ धार्मिक परंपरा जपली नाही, तर समाजातील बंधुभाव, एकोपा, प्रेम आणि सामाजिक एकात्मता अधिक दृढ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. विविध ठिकाणांहून येणाऱ्या भाविकांना एकत्र आणणारा हा सोहळा श्रद्धेच्या बळावर पिढ्यान्पिढ्या पुढे चालत आलेल्या धार्मिक संस्कृतीचा गौरवशाली वारसा आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात भाविकांनी सहभागी होऊन प्रार्थना, भक्ती आणि एकात्मतेचा अनुभव घ्यावा.

सार्वजनिक श्रीगणेशोत्सव देखावे स्पर्धेचे २० नोव्हेंबर रोजी होणार बक्षीस वितरण

नगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित सार्वजनिक श्रीगणेशोत्सव देखावे स्पर्धा सन २०२६-२७ च्या बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता छत्रपती संभाजी नगर रोडवरील मनपाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृहात करण्यात आले आहे. आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते व महापौर ज्योती गाडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि आयुक्त यशवंत डांगे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. सभापती दिपाली बारस्कर, सुभाष लोंढे, वर्षा सानप तसेच उपायुक्त निखील फराटे, मेहेर लहारे व सहाय्यक आयुक्त हरीकल्याण येलगट्टे, देखावे स्पर्धा परीक्षण समितीचे सदस्य, नगरसेवक हेही कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन क्रीडा विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका यांनी केले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टांत नमूद केलेली फ्लॅट मिळकत मौजे सावेडी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील असून सदर मिळकतीचे विद्यमान मालक (१) श्री. राहुल प्रभाकर फाटे. (२) सौ. मृणालिनी राहुल फाटे. दोघे रा. नाशिक हे असून सदर मिळकत त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी आहे. तरीही सदर मिळकतीबाबत कोणाचीही खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, बक्षीसपत्र कर्ज, बोजा, लिज, लिन, वारसाहक्क, कोर्टमनाई हुकूम अथवा जप्ती, कोर्ट कार्यवाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, इजमेंटरी राईट, तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्या सह खालील पत्त्यावर समक्ष आणून दयावी व पोहोच घ्यावी मुदतीत कोणाचीही काही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी आहे असे समजून, सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार, सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी आहे असे समजून पूर्ण करण्यास कुठलीही कायदेशीर अडचण राहणार नाही. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

डि।। अहिल्यानगर सब डि।। ता. नगर पैकी मौजे सावेडी येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील टी.पी. स्कीम नं. ४, फायनल प्लॉट नं. १४३, एकूण क्षेत्रफळ ५३६.०० चौ.मी. यावर बांधकाम असलेल्या कृष्णा कावेरी कॉम्प्लेक्स या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०१, फ्लॅटचे बांधकाम क्षेत्र ८३.६४ चौ.मी. त्यातील पाणी कनेक्शन, कॉमन एरियाज अॅण्ड फॅसिलिटीज् सह.

यांसी चतुःसीमा :
पूर्व- रिअर मार्जिन, दक्षिण- फ्लॅट नं. २०२, जीना व बाग,
पश्चिम- रस्ता, उत्तर- साईड मार्जिन
येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक तदंगभूत सर्व हक्कासुद्धा यातील जाण्या येण्याच्या हक्कासह.
दिनांक: १९/११/२०२६

अॅड. सागर दिपक गाठे
BA, LLB, LLM
रा. वुन्हाणनगर. अ. नगर, मो. ९७३००४४४४१

जाहीर नोटीशीस हरकत

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस आणि संबंधित पक्षकारांना सुचीत करण्यात येते की, दि. १३/११/२०२६ रोजीच्या नवा मराठा अहिल्यानगर या वृत्तपत्रात अॅड. ओमकार पंडीत मोरे, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर यांच्यामार्फत विद्यमान मालक मे. सिद्धम डेव्हलपर्स मे. प्रितम रचना असोसिएट्स, रा. अहिल्यानगर यांच्या वतीने खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मिळकतीचे वर्णन :-
अहिल्यानगर सब डि. ता. नगर पैकी अहिल्यानगर महापालिका हद्दीतील सावेडी येथील खुल्या प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -
स.नं.८२/ब१/२अ,२ब,२क,२ड,२इ/८२/ब२व१ब/१ते४/८२/ब२व१ अ/प्लॉट नं. १०८ याचे क्षेत्र १६०.०० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट
यांसी चतुःसिमा :-
पुर्वेस : ९ मी रस्ता दक्षिणेस : प्लॉट नं. १०९
पश्चिमेस : सर्व्हे नं. ८२ पै. मंजुर रेखांकन उत्तरेस : प्लॉट नं. १०७
आमचे अशील सौ. स्वाती प्रदिप वाघमारे, रा. कोहिनुर मंगल कार्यालयामागे, गुलमोहोर रोड, सावेडी, अहिल्यानगर यांनी जुना सर्व्हे नं. ७४,७५,७६ तसेच नवीन सर्व्हे नं. ७९,८१,८२ व ८३ एकुण क्षेत्रफळ ७६ एकर चे साठेखत केलेले असुन व साठेखत केलेले आहे. तसेच वरील मिळकत अहिल्यानगर मौजे. सावेडी मधील असुन सदर जमिनीचे मा. महसुल राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी ही मिळकत इनाम वर्ग -२ ब ची पर्सनल इनाम म्हणुन घोषीत करण्यात आलेली आहे. तसा आदेश झालेला असुन त्यासंदर्भात सदर जमिनीबाबत मा. जिल्हा न्यायालय अहिल्यानगर कोर्टामध्ये स्पेशल सिव्हील सुट २६९/२०२२ व MCA, ०८/२०२४ तसेच मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ मध्ये पीटीशन नं. १५३२४/२०२३ चालु असुन सर्व दावे न्यायप्रविष्ट आहे.
सदर मिळकतीची चतुःसिमा :-
पुर्वेस :- स.नं. ७३ नगर औरंगाबाद रोड.
दक्षिणेस :- स.नं. ७७ नामदेव चौक ते औरंगाबाद रोड
पश्चिमेस :- स.नं.३९,४० पाऊलबुद्धे शाळा
उत्तरेस : स.नं. ५५,५६ तवले नगर
तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा, गहाणखताचा, बक्षिसपत्राचा किंवा इतर कोणताही आर्थिक व्यवहार करू नये, कोणीही असा व्यवहार केल्यास तो माझ्यावर आमचे अशील सौ. स्वाती प्रदिप वाघमारे, रा. कोहिनुर मंगल कार्यालयामागे, गुलमोहोर रोड, सावेडी, अ.नगर यांच्यावर बंधनकारक राहणार नाही आणि होणाऱ्या नुकसानीस संबंधित व्यक्ती स्वत: जबाबदार राहतील. ही हरकत मी सौ. स्वाती प्रदिप वाघमारे, रा. कोहिनुर मंगल कार्यालयामागे, गुलमोहोर रोड, सावेडी, अ.नगर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून मुदतीच्या आत कायदेशीर पुराव्यासह नोटीशीस हरकत नोंदवत आहे.
दिनांक १९/११/२०२६, ठिकाण : अहिल्यानगर
हरकत घेणार : सौ. स्वाती प्रदिप वाघमारे
मो.नं. ९८५०५७५१५०

अॅड. महेश एस. जोशी
(अॅडव्होकेट व नोटरी पब्लिक भारत सरकार)
अश्वमेध कॉर्नर, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर ४१४००३(एमएस)
मो-९८२२०४७८६१

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

बिबट्याला तातडीने जेरबंद करा अन्यथा तीव्र आंदोलन करणार

सिव्हिल हडको, तारकपूरसह विविध भागांत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!; तातडीने पिंजरे लावून पकडण्याची मागणी



अहिल्यानगर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, पंकज कॉलनी, समता कॉलनी, तारकपूर, सिव्हिल हडको, प्रकाशपूर तसेच गंगा उद्यान रोड परिसरात गेल्या तीन दिवसांपासून बिबट्याचा मुक्तसंचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत शिवप्रहार संघटनेने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे.

नगर – अहिल्यानगर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, पंकज कॉलनी, समता कॉलनी, तारकपूर, सिव्हिल हडको, प्रकाशपूर तसेच गंगा उद्यान रोड परिसरात गेल्या तीन दिवसांपासून बिबट्याचा मुक्तसंचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील दाट लोकवस्तीच्या भागात बिबट्याचा वावर असल्याने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच सकाळी आणि रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या परिस्थितीची दखल घेत शिवप्रहार संघटनेने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे. संबंधित परिसर दाट लोकवस्तीचा असल्याने बिबट्या वस्तीत शिरल्यास एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने विशेष पथक तैनात करावे, परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

तसेच मिस्किन मळ्यासमोर लोकवस्तीच्या शेजारी तातडीने पिंजरे आणि ट्रॅप कॅमेरे बसवावेत. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्याला सुरक्षितरीत्या पकडण्यासाठी वनविभागाने युद्धपातळीवर कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वनविभागाने तातडीने ठोस पावले उचलून नागरिकांना भयमुक्त करावे, अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देताना शिवप्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के, प्रशांत सराईकर, अतुल चौधरी, अभिजीत भांडवलकर, विकी निक्रड, संदीप संसारे, राजेंद्र कडिले आदी उपस्थित होते.

दारू विक्री करणाऱ्याला पकडले

नगर – सिद्धी बाग येथील संबोधी महाविद्यालयाच्या आडोशाला बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टीची तयार दारू विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका इसमावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १ हजार रुपये किमतीची १० लिटर गावठी दारू जप्त केली असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार भानुदास खेडकर, रियाज इनामदार, सतीश शिंदे आणि बाळासाहेब भापसे यांच्या पथकाने ही कारवाई केली. यामध्ये सुहास गंगाराम वण्णम (वय ४९ वर्षे, रा. सुडके मळा, बडोदा बँक कॉलनी, अहिल्यानगर) यास ताब्यात घेण्यात आले असून त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आयएमएस संस्थेच्या १४ विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये टेस्ट ऑफ मॉम मध्ये १५.५ लाखपॅकेज वर निवड

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आयएमएस) संस्थेच्या १४ विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये नामांकित कंपनी टेस्ट ऑफ मॉम मध्ये रु. १५.५ लाख वार्षिक पॅकेज वर निवड झाली आहे. श्रृष्टी काळे, ओंकार रणमळे, अंजली विठ्ठल रेडे, उपासना त्रिभुवन, वेद महेंद्र वसाळ, प्रथमेश रमेश गुज्रा, नेहा नारंग, प्रेरणा हेमंत गुगळे, समृद्धी मधुकर, दिशा अनिल गुंजाळ, तनया सुरेश कदम, कौशल श्रीकांत पवसे, वैष्णवी महादेव शिंदे, माहिन नाशिर शेख या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

संपूर्ण प्लेसमेंट प्रक्रिया सेलचे प्रा. सुरेश खन्ना यांच्या पुढाकाराने यशस्वीरित्या पार पडली. प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबास, सल्लागार डॉ.एम.बी.मेहता यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा कालवा विभाग संगमनेर , जिल्हा : अहमदनगर यांचे कार्यालय

पत्ता- कार्यकारी अभियंता उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, नाशिक-पुणे महामार्ग, घुलेवाडी फाटा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८
दुरध्वनी व फॅक्स- ०२४२५- २३२२४८ eeupcsmgr@gmail.com, ceupcd.sngmnrwrd@maharashtra.gov.in

निविदा सूचना क्र. ०५ सन २०२६-२०२७ (प्रथम प्रसारण) (ऑफलाईन)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावर निविदा नोटीस पहाणेसाठी उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदेबाबत विस्तृत माहिती तसेच निविदा सूचनेमध्ये काही बदल झाल्यास विभागाचे सुचना फलकावर अथवा विभागीय कार्यालयात पहावयास मिळेल. सदर निविदा हि फक्त पात्र सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेसाठीच राखीव ठेवण्यात आलेली आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदेची अंदाजित किंमत रुपये (लक्ष)
१	उर्ध्व प्रवरा डावा कालवा किमी. २९ ते ४५, कोपरगाव शाखा कालवा, अंत्य कालवा, किमी. ४५ ते ५८, निम्नस्तर वितरिका कालवा, किमी. ६६ ते ८५ व तळेगांव शाखा कालवा वरील आवर्तनासाठी आवश्यक मजूर व यंत्रसामुग्रीचा पुरवठा करणे.	रु. ८,४७, ८२३/-
जिल्हा :	अहिल्यानगर	
निविदा उपलब्ध कालावधी	दि. २०/११/२०२६ स. ११.०० वा. पासून ते दि. २७/११/२०२६ सायं. १८.०० वा. पर्यंत	

जाक्र.उप्रकावि/निविदा/ /सन २०२६
उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर
दि. १६/११/२०२६
जिमाका /नगर/जाहि/१८८/२०२६

(अ. बा. कवडे)
कार्यकारी अभियंता
उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर

फसवणुकीच्या गुन्ह्यात जप्त केलेले १८४ ग्रॅम सोने फिर्यादीस सुपूर्द

जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार एमआयडीसी पोलिसांची कारवाई



नगर –नगर तालुक्यातील निंबळक येथील मुलीचा विश्वास संपाद

घर किंवा बंगलो विकत पाहिजे
(प्रेमदान चौक, प्रोफेसर चौक, टीव्ही सेंटर या जवळच्या परिसरात)
3BHK तरी पाहिजे
8796527677

ऑफिस कामासाठी अनुभवी मुले-मुली पाहिजे
सन्मान ग्राफिक्स
आशा टॉकीज चौक,बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटल जवळ,नागरेगल्ली,अ.नगर
9822236321

पाहिजेत
Msc Biology/ Microbiology
(जागा -०१)
Bsc Nursing
(जागा -०२)
पंडित हॉस्पिटल
कोठी रोड, अहिल्यानगर
8847731240
8446676464

पाहिजेत
रुमबॉय
जागा-२
O HOTEL
सावेडी रोड, अहिल्यानगर
9881172732
8668553019
9823232599

पाहिजेत
हमाल - जागा २
पूर्णवेळ, वय - १८ ते ४० वर्षे
(रु. ५०० रुपये दरशेज)
कामाची वेळ : सकाळी ९.३० ते सायं. ७.००
- आकर्षक पगार | समक्ष भेटा -
के. प्रकाश अँण्ड कंपनी (गांधी)
मुंजोबा स्वीटस् शेजारी, मार्केटयार्ड रोड, अहिल्यानगर. मो. 9665511179

पाहिजेत
ड्रायव्हर पाहिजे
-संपर्क-
सुखदा हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, अहमदनगर

पाहिजेत
अहिल्यानगर शहर व जिल्हा करीता सर्व कंपनीचे लुब्रीकेंट आईल व ग्रीसचे मार्केटींग करण्याकरीता
अनुभवी सेल्स ऑफीसर पाहिजे
(आकर्षक पगार+भत्ता)
एस के ट्रेडींग कंपनी
मार्केटयार्ड हमाल पंचायत समोर, अहिल्यानगर
7507100662 / 9545750753

विकणे आहे
शिंप्पी गल्ली तेलीखुंट, कापड बाजारजवळ असलेली
४१० स्क्रे. फुट
जागा विकणे आहे.
8010150186

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत
* कारागीर - ४
* हेल्पर - ६
प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी, अहिल्यानगर
9822499210
9657646555

पाहिजेत
बँकिंग टेलिकॉलिंगसाठी
मुले/मुली : १०
टीम लिडर : २
(अनुभवींना प्राधान्य-आकर्षक पगार+ इन्सेंटिव्ह)
ईझी लोनस C/O एअरटेल
ऑफि स.नं.-९८, एम.आर.देड सेंटर, बाडिसापार्क, अ.नगर
8600606060

पाहिजेत
साबण एजन्सी व किराणासाठी हेल्पर पाहिजे-२
(होतकरू व मेहनती काम करणारा)
9901077002

ड्रायव्हर पाहिजे
मीरा सर्व्हिसेस, अहिल्यानगर येथे लो बेड ट्रेलरकरिता अनुभवी ड्रायव्हरची तातडीने आवश्यकता आहे.
इच्छुक उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
पत्ता- मार्केट यार्ड, अहिल्यानगर
8007207874

खालील जागा भरणे
१) खाकीदास बाबा शॉपींग सेंटरमध्ये स्त्री कामगार भारती करणे आहे.
(जागा -१),
(१२ वी किंवा, ग्रॅज्युएट महिला)
(लालटाकी रोड, मारुती मंदिराशेजारी गाळा नं.६, राज ट्रेडींग कंपनी बी-८)
२) मेघनंद मसाले साठी सेल्समन भरणे आहे.
(जागा -३) पुरुष,
(वय ३० ते ४५, निर्व्यसनी, अनुभव किमान २ वर्षे प्राधान्य)
३) ड्रायव्हर भरणे आहे
(जागा -२) (निर्व्यसनी, वय ३५ ते ४५)
भेटण्याची वेळ सकाळी १० वाजता
मेघनंद मसाले D/84 MIDC अहिल्यानगर
रविवार दिनांक २२/११/२०२६
व्यवस्थापक 9850600400

टँकर पाणी मिळेल
संत्रा बागेसाठी लागणारे गोड पाणी आमचेकडे टँकर भरुन पोहोच मिळेल
(संपर्क-राधाकृष्ण भालसिंग)
9421588875

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे.
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर

पाहिजेत
हॉस्पिटलसाठी
सिस्टर्स (जागा २)
(ANM/GNM), (Day/Night)
मावशी (जागा २)
साकार हॉस्पिटल
पोलीस कॉलनी जवळ, बालिकाश्रम रोड, अ. नगर
9822294489

पाहिजेत
सावेडी रोड येथील हरीश फर्निचर या शोरुमसाठी
हुशार सेल्सगर्ल्स जागा २
कामगार - जागा २
: समक्ष भेटा :
हरिष स्टील फर्नीचर
स्मिता अपार्टमेंट,सावेडी रोड,अ.नगर
9822506521
9284026677

पाहिजेत
नामांकित कंपनी
हॅप्पी मेडिकेअर
सावेडी, अहिल्यानगर येथे नामांकित कंपनीत ऑफिस कामासाठी मुली व मुले पाहिजेत.
शिक्षण -१२ वी पास व पदवीधर,
वयोमर्यादा १९ ते ३० पर्यंत
संपर्क
9172194775
8459809981

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : १६ ते १९ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात




SCREEN - 2
09.00 AM 150/- 2D
01.00 PM 200/- 2D
05.00 PM 200/- 2D
09.00 PM 200/- 2D

SCREEN - 1
09.30 AM 200/- 3D
01.30 PM 250/- 3D
05.30 PM 250/- 3D
09.30 PM 250/- 3D

कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

अॅडव्हान्स बुकिंग सुरू
MY CINEMA
AHILYANAGAR'S 1ST
5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
अॅडव्हान्स बुकिंग सुरू



Show - 20/11/2026 to 22/11/2026
RAMAYANA (2D) - 10:45 am, 1:00, 2:30, 4:30, 5:25, 8:45, 9:30 pm,
RAMAYANA (3D) - 8:45 am, 12:15, 3:35, 6:55, 10:15 pm, JIJAI (Marathi) - 3:45 pm,
OM CHAPTER 1 - 11:15 am, 10:15 pm,
AADI ANANT (Marathi) - 4:15, 7:50 pm,
BANDHU (Marathi) - 1:30 pm,
CHIKEEZING (Marathi) - 2:05 pm,
MAITREYYA (Marathi) - 6:45 pm,
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

2x2 पुशबॅक सिट, AC, एअर सस्पेन्शन लक्झरी, 49 सिटर बसने प्रवास
११ मारुती दर्शन
दि. २५/२६/२७ डिसेंबर २०२६
श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबाची वाडी, मोरगांव इ.
३ दिवस

रेल्वे प्रवास AC 3 टियर कोच
राजस्थान स्पेशल मेवाड व मारवाडसह
दि. ३१ जाने. ते १३ फेब्रु. २०२७
जोधपूर, जैसलमेर, जयपूर, बिकानेर, पुष्करतिर्थ, चितोडगड, उदयपूर, माऊंटअबु, खाटुश्याम, सालासार बालाजी
१४ दिवस
बुकींग अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६

2x2 पुशबॅक सिट, AC, एअर सस्पेन्शन लक्झरी, 49 सिटर बसने प्रवास
नर्मदा परिक्रमा
दि. १८ मार्च ते ३ एप्रिल २०२७
शेगांव, ओंकारेश्वर, प्रकाशा, बडवानी, बिमलेश्वर, निलकंठेश्वर, नारेश्वर, गरुडेश्वर, महेश्वर, उज्जैन, नेमावर, जबलपूर, अमरकंटक, महाराजपूर, होशंगाबाद
१७ दिवस

संपर्क
श्री रेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस (यात्रा कंपनी)
ऑफिस : शॉप नं. ३, नीलम प्रोव्हिजन स्टोअर्ससेजारी, पोलीस कॉलनी, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर.
श्री. शाम क्षीरसागर 9922240515 9405032698
सौ. दिपा जोशी 8379841261 9404401699

फक्त ७ दिवसांत Tally शिका
स्कॉलर कॉम्प्युटर्स
नवीपेठ रस्ता, महापालिका दवाखान्याच्या मागे, अहिल्यानगर
9921754135



An ISO 9001:2015 Certified
DiSHA®
COMPUTER INSTITUTE
Enroll Now
www.dishagroup.in

PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT

DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM

दिल्ली गेट शाखा
आनंद केअर हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पत्रिका चौक, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769

जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड जवळी. अ.नगर.
9371151769

पाईपलाईन शाखा
रघा गार्डन बिल्डिंग, मिलाचा चौक, पाईपलाईन रोड उड्डाणपूल
7447761769

समर्थ पेस्ट कंट्रोल
झुरळ, पाल, मुंग्या, कोळी, मच्छर, वाळवी, ढेकुण, उंदीर, मधमाश्या, वाळवी यांच्या त्रासापासून खात्रीशीर मुक्तता तसेच घर, बंगला, दुकाने, गोडावून, ऑफिस, फॅक्टरिज, हॉटेल, पतसंस्था, बँक इ. ठिकाणी पेस्ट कंट्रोल करुन मिळेल.
9890692159
9503105050

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
१९ नोव्हेंबर २०२६



रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 03:30 PM
08:45 AM 05:30 PM
10:00 AM 07:15 PM
11:45 AM 08:00 PM
12:30 PM 09:15 PM
01:45 PM 11:00 PM
11:35 PM

रामायण ३ डी (हिंदी)
10:45 AM 06:15 PM
02:30 PM 10:00 PM

आधी अनंत (मराठी)
04:45 PM

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

सहावे पुण्यस्मरण



स्व. नानकराम मोटुमल नवलानी
स्व. दि. १९/११/२०२०
सूरज जैसी चमक, चंद्रमा की शीतलता
आकाश जैसी माया, सागर जैसा विशाल मन
आप की प्रेरक स्मृति से ही बना हमारा जीवन..
आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रध्दांजली
* शोकाकूल *
समस्त नवलानी परिवार, अ.नगर
* फर्म *
नानक जनरल स्टोअर्स, अ.नगर
नानक कलर शॉपी, अ.नगर | डी.एन. पेंटस्, अ.नगर

आठवे पुण्यस्मरण



स्व. बाळासाहेब गांधी (गांधी बी वाले)
स्व. दि. २०/११/२०१८
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा.. स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
- दुखांकित -
व्ही.मनमोहनदास अँण्ड सन्स मार्केट यार्ड, अहिल्यानगर. ९४२२२२१३७९
के. प्रकाश अँण्ड कंपनी मार्केट यार्ड,रोड अहिल्यानगर. ९८५०१११७७९
इंटरनॅशनल अॅग्रीकल्चरल इंडस्ट्रीज ए.डी.सी.सी बँक जवळ,अहिल्यानगर ९५२७५८६९७९
गांधी बी वाले परिवार

फ्रेश स्टॉक
महावीर मॉल...
स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.
जेन्टस-लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर, हँड ग्लोज, उलन कॅप सर्व साईझमध्ये आणि होलसेल दरात..
सरसकट २०% डिस्काऊंट..



मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ,मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001